
# घारापुरी

म. ग्रं. सं. ठाणे
विषय बाल-वाङ्मय
वा. नं.

म. ग्रं. सं.
विषय बाल-वाङ्मय

IRBK-0103175
IRBK-0103175



३७५५

# धारापुरी

२८.११.१९०८


: लेखक :

सदाशिव आत्माराम जोगळेकर,

एम्. ए., एल्एल्. बी.

' मानवी कर्तव्यें ', ' मॅझिनीचें चरित्र ' व ' स्वातंत्र्याचीं मूलतत्त्वें '
इ. पुस्तकांचे कर्ते



सन १९४८

[ आवृत्ति १ ली ]


३७५५


मूल्य १० आणे

— एकमेव विक्रे

चित्रशाळा प्रकाशन,


IRBK-0103175


IRBK-0103175

: प्रकाशक :
यशवंत गोपाळ जोशी,
६२३/१५ सदाशिव, पुणे २

( सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन )

: मुद्रक :
श्रीपाद रघुनाथ राजगुरु,
राजगुरु प्रेस, ४०५ नारायण पेठ,
पुणे २

म. ग्रं. सं. ठाणे.




## प्रास्ताविक

घारापुरींचीं लेणीं अद्वितीय आहेत—आणि हें महाराष्ट्राचें एक अभिमानस्थान आहे.

मुंबईच्या हिंदुस्थान—महाद्वारापासून घारापुरी बेट सुमारें सात मैलांवर व कोंकण किनाऱ्यापासून सुमारें चार मैलावर आहे. या छोट्या बेटाचा परिध पांच मैलांहून कमी आहे. त्यावरील डोंगरही असेच छोटेखानी आहेत. मोरे बंदर, राजबंदर उर्फ घारापुरी व शेटे बंदर अशीं तीन खेडीं व उतार या बेटावर आहेत. महाद्वाराजवळून घारापुरीला जाण्यासाठीं सकाळीं व सायंकाळीं सोयिस्कर व स्वस्त बोटी, पडाव व होड्या मिळतात. सकाळीं जाऊन संध्याकाळीं परत यावें, म्हणजे सर्व ठिकाणें नीट पाहतां येतात. हा छोटा प्रवास सुखासुखीं होऊं देणें न देणें सागराच्या लहरीवर अवलंबून असतें. चालू उतार बेटाच्या वायव्येस व जुन्या उतारापासून सुमारें अडीचशें याडांवर आहे. येथील धक्का अलग व निसरड्या दगडांचा असल्यामुळें संभाळून चालावें लागतें. लेणीं धक्क्यापासून अर्ध्या मैलावर आहेत. येथून लेण्यांच्या पातळीपर्यंतचा रस्ता दगडी बांधीव

आहे. घारापुरीला महाशिवरात्रीस यात्रा भरत असल्यामुळें यात्रेकरूंच्या सोयीसाठीं करसनदास रणमल या शिवभक्त लोहाणा व्यापाऱ्यानें १८५३ सालीं सुमारें बारा हजार रुपये खर्च करून हें बांधकाम केलें. श्रीमंत वा अशक्त प्रवाशांना वाहून नेण्यासाठीं येथें खुर्च्यांही तयार असतात.

## एलिफंटा


घारापुरी हें नांव गिरिपुरीपासून निघालेलें असावें असा कांहीं संशोधकांचा कयास आहे ; तर कांहींचें म्हणणें आहे कीं तें मंगलपुरी या नांवाचें अपभ्रष्ट स्वरूप आहे. मला वाटतें, घेरापुरी, पुरी या प्राचीन राजधानीचा घेरा — परिसर, या समासावरून हें नांव सिद्ध झालें असावें. बेटाच्या दक्षिण बाजूच्या उताराजवळच्या उंचवट्यावर असलेल्या व लांबवरून दिसणाऱ्या एका प्रचंड दगडी हत्तीवरून पोर्तुगीजांनीं सोळाव्या शतकांत या बेटाला एलिफंटा हें नांव दिलें व इंग्रजांच्या अमदानींत तें रूढ झालें. आतां तो हत्ती तेथें नाहीं व इंग्रजी राज्यही नाहीं ; आणि आतां आपल्याला फिरंगाळलेलीं नांवें विसरावयाचीं आहेत ; म्हणून या लेखांत बेटाला त्याचें मराठी नांव दिलें आहे.

घारापुरीला एलिफंटा हें नांव ज्यावरून पडलें ती हत्तीची दगडी प्रतिमा घारापुरी खेड्यानजीकच्या एका उंचवट्यावर होती. ही प्रतिमा सव्वासात फूट उंच व सव्वातेरा फूट लांब होती. ही प्रतिमा तेथें होती तेव्हां ती पाहिलेले परदेशी प्रवासी सांगतात कीं ती लांब-वरून दिसत असे ; आणि दोनशें यार्डांवरून तर ती अगदीं खऱ्या-खुऱ्या हत्तीसारखी भासत असे. पोर्तुगीजांनीं पहाऱ्याचा बुरूज नजीकच उभारला होता. उन्हापावसांत व समुद्रावरून वाहणाऱ्या खाऱ्या वाऱ्यांच्या माऱ्यांत उभ्या असलेल्या या हत्तीचा दगड कुजून गेला. १५३४ सालापासून प्रवाशांच्या लिखाणांत या हत्तीचे उल्लेख आढळतात. १७६० सालीं येथें आलेल्या प्रवासी पेरॉनला या हत्तीच्या पाठीवर हत्तीचा छावा असावा असें वाटलें ; दुसऱ्या एकाला वाटलें कीं त्याच्या

पाठीवर व्याघ्र असावा. संभव आहे कीं त्यांना जें दिसलें तें अंबारीचे अवशेष असावेत. १८१४ सालीं हत्तीची सोंड भंगली. १८६४ सालीं या हत्तीचें खडींत रूपांतर करण्याचा वास्तुविभागांतील एका अधिकाऱ्याचा बेत होता; पण तो कृतींत उतरण्यापूर्वींच पुरातन वस्तूंबद्दल आस्था असणाऱ्या अधिकाऱ्यांनीं हत्तीचा बचाव केला. सर जॉर्ज बर्डवुड यांच्या खटपटीमुळें या हत्तीचीं छकलें मुंबईस आणण्यांत आलीं व तीं जोडून उभा केलेला हत्ती आतां राणीच्या बागेंत पाहावयास मिळतो. त्रिमूर्ति लेण्याच्या दक्षिणेस एक प्रचंड दगडी घोडा खडा होता. त्याचें खोदकाम असें कौशल्यानें केलेलें होतें कीं दुरून पाहणारास वाटावें कीं टेंकाडावर खरा घोडा उभा आहे. दक्षिणापथाच्या पूर्वेस, गंगासागराच्या किनाऱ्यावर कोनार्क येथें अशाच गजाश्वांच्या प्रतिमा अजूनही खड्या आहेत, त्यांची आठवण या वेळीं झाल्यावांचून राहत नाहीं. जें अज्ञात त्याचा संबंध अद्भुताशीं लावण्याची पौर्वात्यांची पद्धत आहे. म्हणूनच आपल्याकडील लेणीं हीं पांडवकृत्यें आहेत असें मानण्यांत येत असे. अशा कृत्यांचें कर्तृत्व पांडवांकडे देणें हें एतद्देशीय मुसलमानांना कसें सहन होणार? म्हणून घारापुरीचा घोडा ही अलेक्झँडरच्या लाडक्या घोड्याची प्रतिमा आहे अशी दंतकथा मुसलमानी व्यापाऱ्यांनीं रूढ केली होती. १६७३ सालीं पाश्चात्य प्रवासी फ्रायरनें पाहिला तेव्हां हा घोडा पोटाइतका जमिनींत गाडला गेला होता आणि १७८४ च्या सुमारास बिचारा सर्वस्वीं अदृश्य झाला!

## महामंडप


घारापुरीचें मुख्य लेणें समुद्रसपाटीपासून सुमारें अडीचशें फूट उंचीवर असून तें उत्तराभिमुखी आहे. लेण्याच्या पूर्वेस व पश्चिमेसही द्वारें होतीं, पण खडक कोसळल्यामुळें तीं वापरांत नाहींत. या लेण्यांतील मुख्य शिल्पकृत्य त्रिमूर्ति हें आहे. ही मूर्ति हेंच या मंडपातील शिल्पकृत्यांचें केंद्रस्थान आहे असें मानलें तर ती उत्तराभिमुखी असल्यामुळें उत्तरेकडील प्रवेशद्वार हेंच महाद्वार असलें पाहिजे असें



वाटतें. शिवाय याच प्रवेशद्वारासमोरचा सर्व खडक खोदून काढलेला आहे. पाऊस व वादळी वारे यांच्या माऱ्याचा शिल्पांवर परिणाम होऊं नये म्हणून ही योजना हेतुपुरःसर करण्यांत आली असल्याचा संभव आहे. याच हेतूनें शिल्पकारांनीं आणखी एक योजना केली होती. या महाद्वारावर सुमारें चार फूट रुंदीची व दोन खांबांवर आधारलेली वळचण ठेवलेली होती; ती खांबांसह नष्ट झाली आहे. लेण्याचा मंडप औरसचौरस एकशें तीस फूट लांबीरुंदीचा व पंधरा ते सतरा फूट उंचीचा आहे.

मंडपाचें छत सव्वीस खांबांवर आधारलेलें होतें; त्यांपैकीं आठ पडून गेले आहेत. हे खांब तीन फूट चार इंच लांबीरुंदीचे असून आठ फूट उंचीपर्यंत चौकोनी आणि वर वर्तुलाकार व खोबणी खोदलेले आहेत. चौकोनी भाग संपतो तेथें एका चिंचोळ्या पट्ट्यावर छोट्या मूर्ति व नकशीचे नमुने खोदलेले आहेत. वर्तुलाकार भागाच्या शेंड्याजवळ नकशी खोदलेली असून वरील भागाला चुण्यांचा व मध्यें आडवा पट्टा असलेला अशा घातलेल्या गिरदीचा आकार दिलेला आहे. खांबांच्या शिखरांजवळ कंगण्या खोदून छताचा आधार वाढविलेला आहे. खांबांच्या नकशीकामांत साधर्म्य नसून भरपूर विविधता आहे.

लेण्यांतील शिल्पकृत्यांचें वर्णन करण्यापूर्वीं त्यांची मांडणी कशी आहे तें सांगतों. मण्डपांत पश्चिम बाजूला साडेएकोणीस फूट लांबी-रुंदीचें व छतापर्यंत पोंचणारें चौरस शिवमंदिर आहे. त्याच्या चारी दिशांना द्वारें आहेत. यामुळें या मंदिराचें मुख कोणत्या बाजूला आहे हें निश्चित करतां येत नाहीं. शिवमंदिरें बहुशः पूर्वाभिमुखी असतात. या मंदिराच्या पूर्वेकडे समांतर अशा खांबांच्या चार जोड्या आहेत. मण्डपाच्या पश्चिमद्वारापेक्षां पूर्वद्वार विशेष कसोशीनें खोदलेलें आहे; इतकेंच नव्हे, तर पूर्वेकडील मोकळ्या आवारांत वर्तुळाकार चौथरा आहे, त्यावर कधीं काळीं नंदीची प्रतिमा असणें संभवनीय आहे. त्यावर उभें राहून पाहिलें म्हणजे




[१ त्रिमूर्ति. २ अर्धनारीश्वर. ३ गंगाधर; त्रिवेणी. ४ मानवती पार्वती. ५ कल्याणसुंदर–शिवपार्वती-विवाहमङ्गल. ६ अंधकासुरवध : भैरव. ७ कैलासधारी रावण. ८ नटराज शिवताण्डव. ९ लकुलीश : महायोगी. १० गणेश. ११ सप्तमातृका. १२ शूलपाणि. १३ भैरव. १४ द्वारपाल. १५ शिवमंदिर. १६ नंदीचा चवुतरा. १७ जलाशय. १८ महायोगी.]

हें मन्दिर हेंच या मण्डपाचें केंद्र आहे असें प्रत्ययास येतें. हें मानलें तर तें पूर्वाभिमुखी आहे असें ठरतें आणि येथील शिल्पांची रचना या मंदिराभोंवतीं केलेली आहे असें वाटूं लागतें. उलट पक्षीं त्रिमूर्ती-समोर समांतर अशा खांबांच्या सहा जोड्या असल्यामुळें मंडप उत्तराभिमुखी आहे असेंही मानावयास हरकत नाहीं. मात्र त्रिमूर्ति हें केंद्र मानलें तर मंडपाच्या मांडणींत समतोलपणा दिसत नाहीं आणि मंदिराला केंद्र मानलें तर उभारणींतील पद्धत व तोल ताबडतोब ध्यानांत येतो.

कसेंही मानलें तरी त्रिमूर्ति हेंच या लेण्यांतील प्रधान व प्रेक्षकांचें लक्ष वेधून घेणारें शिल्प आहे हें निर्विवाद आहे. ही मूर्ति उत्तराभिमुखी आहे. तिच्या ओळींत पूर्वेस नारीश्वर व पश्चिमेस गंगावतरण, शिव-पार्वती वा त्रिवेणीसंगम; आणखी पुढच्या ओळींत पूर्वेस मानवती पार्वती व पश्चिमेस शिव-पार्वती यांचें विवाहमङ्गल अथवा कल्याणसुंदर मूर्ति. या सर्व मूर्ति उत्तराभिमुखी आहेत. विवाह-मूर्तीसमोर भैरव अथवा अंधकासुरवध आणि मानमूर्तीसमोर कैलासधारी रावण अथवा रावणानुग्रह अशा दक्षिणाभिमुखी मूर्ति आहेत. उत्तरेकडील महाद्वाराचे पश्चिमेस शिवताण्डव आणि पूर्वेस लकुलीश अथवा महायोगी शिव, अशा मूर्ति समोरासमोर आहेत. याच अनुक्रमानें आपण या मूर्तींची तपशीलवार पाहणी करूं.

## त्रिमूर्ति

येथील त्रिमूर्ति ही प्रतिमा महाराष्ट्रांतच नव्हे तर भारतांत अद्वितीय आहे. केवळ आकारानें प्रचण्ड अगर अपूर्व मूर्ति या दृष्टीनेंच नव्हे तर शिल्पकौशल्याच्या दृष्टीनेंही जगांतील उत्कृष्ट शिल्पकृत्यांत या मूर्तीची गणना करण्यांत येते.

ब्रह्मा, विष्णु व महेश यांना जगाची उत्पत्ति, स्थिति व लय यांचे कारक मानण्यांत येतें. त्रिमूर्तींत या तीन देवांचा व शक्तींचा समन्वय करण्यांत आला आहे. कोणी म्हणतात कीं या तीन देवता

अनुक्रमें रज, सत्त्व व तम यांच्या द्योतक आहेत. मैत्रायणोपनिषदांत सगुण त्रिमूर्तिकल्पनेचा पहिला उल्लेख आढळतो. प्रेक्षकाच्या डावी-कडे रुद्र, मध्यें ब्रह्मदेव आणि उजवीकडे विष्णु, अशी ही त्रिमूर्ति आहे, असें साधारणतः मानण्यांत येतें. प्राचीन व मध्ययुगीन संस्कृत ग्रंथांतील त्रिमूर्ति-शिल्पाच्या वर्णनांवरून वाटतें कीं त्यांना अभिप्रेत असलेल्या मूर्ति आपादमस्तक असल्या पाहिजेत. श्री. खरे यांनीं मूर्तिविज्ञानांत पेशावर म्यूझियममधील त्रिमुख महेशाचें चित्र दिलें आहे. तें हुबेहुब आधुनिक दत्तात्रेयासारखें दिसतें. श्री. गोपीनाथराव यांनीं आपल्या ग्रंथराजांत शिवप्रमुख व विष्णुप्रमुख त्रिमूर्तींची माहिती व चित्रें दिलीं आहेत. मध्यस्थानीं असलेल्या मूर्तीवरून त्यांनीं हें वर्गीकरण केलेलें आहे. प्रचलित प्रवाद गृहीत धरून या दृष्टीनें पाहिलें तर घारापुरी येथील त्रिमूर्ति ब्रह्मप्रधान आहे असें म्हटलें पाहिजे. त्रिमूर्तिकल्पनेला सांप्रदायिक स्वरूप आलें तेव्हां ज्याचा जो देव त्यास देवाधिदेव व इतरांना त्याचे अंश असें मानण्यांत येऊं लागलें. याप्रमाणें कित्येकांचें म्हणणें आहे कीं शिव हाच महादेव, देवाधिदेव, तोच जगदुत्पत्तिस्थितिलयकर्ता; म्हणून हीं तिन्ही रूपें शिवाचींच आहेत.

त्रिमूर्तीच्या गाभाऱ्याला साडेपंधरा फुटांची मोकळी असलेली चौकट आहे. चौकटीच्या डाव्या-उजव्या कोपऱ्यांत खोचणी आहेत; दारांचे आंख धरण्यासाठीं त्या खोदण्यांत आल्या असल्या पाहिजेत. आंखांवर फिरणारीं जुन्या पद्धतीचीं दारें ज्यांनीं पाहिलीं आहेत त्यांना हा तर्क सहज पटण्यासारखा आहे. आज अस्तित्वांत असलेल्या चालुक्यकालीन देवालयांमध्येंही अशा दारांची योजना आढळते. येथें निदान कटांजन तरी असलेंच पाहिजे.


चौकटीच्या दर्शनी बाजूंना डाव्या-उजव्या अंगांना दोन प्रचंड द्वारपाल आहेत. उजवीकडील द्वारपाल पावणेतेरा व डावीकडील साडे-तेरा फूट उंचीचे आहेत. कोंपरांजवळ वांकलेले त्यांचे अनुक्रमें डावे व उजवे हात बुटक्या शिवगणांचे मस्तकांवर टेकलेले आहेत. दोन्ही

द्वारपालांच्या मस्तकांवर वेगवेगळ्या धर्तींचे व तपशिलासह खोदलेले मुकुट आहेत. त्यांच्या कानांच्या पाळयांत वर्तुलाकार कुंडलें आहेत. उजव्या द्वारपालाच्या छातीजवळचा भाग फुटून गेला आहे. त्याच्या धोतराचा सोगा कमरेभोंवतीं गुंडाळून गांठ मारून एका बाजूला लोंबता सोडलेला आहे. डावीकडील द्वारपालाच्या गळ्यांत रुद्राक्षांचा हार आणि या खांद्यापासून त्या खांद्यापर्यंत पुष्पमाला किंवा उपवस्त्राची गुंडळी आहे. त्याच्या दंडांवर सर्पांचीं वलयें आहेत. त्याच्या कोंपरापासून खालचा सर्व भाग फुटून गेलेला आहे.

चौकटीच्या आंतल्या बाजुला असलेला गाभारा अधिक विस्तृत आहे. त्याची लांबीरुंदी सुमारें साडेएकवीस फुटांची असून खोली तेरा फुटांची आहे. या गाभाऱ्यांत अडीच फूट उंचीच्या आसनावर त्रिमूर्तीची प्रतिमा आहे. तींत फक्त हृत्कमलापासूनचा वरचा भाग दर्शविलेला आहे. मूर्तीचें खोदकाम उठावाच्या पद्धतीचें आहे, म्हणजे प्रतिमेभोंवतीं प्रदक्षिणा घालतां येत नाहीं. शिरस्त्राणासह मूर्तीची जास्तींत जास्त उंची सतरा फूट दहा इंच आहे. रुद्रमुखाची उंची सर्वांत जास्त म्हणजे पांच फूट असून विष्णुमुखाची उंची चार फूट आहे. भिंवयांच्या पातळींत मूर्तीचा घेर पावणेतेवीस फूट आहे. या मापांवरून या मूर्तीच्या प्रचंडतेची कल्पना येईल.

ब्रह्मदेवाची मुद्रा शांत आहे, श्वास रोधून धरलेला आहे. गळ्यांत मोत्यांचा हार व छातीवर मोत्यांचीं पेंडीं व रत्नांचे लोलक लावलेला जडावाचा हार आहे. डाव्या हातांत महाळुंग आहे. महाळुंग हें गर्भाचें प्रतीक आहे. उजवा हात तुटलेला आहे. डॉम कास्ट्रो यानें या मूर्ति १५३८ सालीं पाहिल्या तेव्हांही हा हात तुटलेलाच होता. ही मूर्ति ब्रह्मदेवाची आहे असें गृहीत धरून गॅझेटियरकार तर्क करतात कीं या हातांत वेदाची पोथी असली पाहिजे. त्याच्या कानांच्या पाळया लांब असून शिवपूजकांप्रमाणें फाटलेल्या आहेत. उजव्या पाळींत व्याघ्र-कुंडल व डाव्या पाळींत मकर-कुंडल आहे. या कुंडलांचें वजन पेलण्यासाठीं त्यांना बाळ्या जोडलेल्या आहेत. मस्तकावर जटाभार

असून त्यावर जडावाचें काम केलेला उंच मुकुट आहे; त्यांत चंद्रकोर आहे आणि कानांवर व कपाळावर पदकें आहेत. कपाळपट्टीवरील



जडावाचें काम कीर्तिमुखाच्या धर्तीचें आहे. त्याबद्दल अर्स्किन म्हणतो कीं तें हिंदूंच्या अभिजात अभिरुचीचें उत्कृष्ट उदाहरण आहे.

रुद्रमूर्तीची मुद्रा मत्त आहे. अर्स्किन म्हणतो, ही मुद्रा व्यसनासक्ति दर्शविते. कॅप्टन हॉलला वाटलें कीं रुद्राच्या मुखावर आनंद दिसतो, राग दिसत नाहीं, कारण त्याच्या गालावर खळगा आहे; त्याला वाटलें कीं तो सर्पसंगीत गात आहे! बर्गेसला रुद्रमुख सस्मित दिसलें. कोणाला तर वाटलें कीं रुद्र भांग पिऊन मस्त झाला आहे. अशा

अनेक भावनांचा संयोग रुद्रमुखावर झालेला दिसतो. रुद्राच्या कपाळावर मध्यभागीं उंचवटा आहे. त्यावरून तेथें त्याचा तिसरा नेत्र असावा असें वाटतें. रुद्राच्या तिसऱ्या नेत्राचा प्रभाव कोणाला माहीत नाहीं? रुद्राची भिंवई नासिकाग्राजवळ वांकलेली आहे; जणुं तो आपल्या शक्ति प्रयत्नपूर्वक आवरून धरीत आहे. ओंठावर मिशा आहेत; त्यांना जणुं सामर्थ्याच्या अहंकाराचा पीळ भरलेला आहे. रुद्राची हनुवटीही इतर प्रतिमांहून भिन्न असून ती त्याचें निश्चयी व अपरंपार सामर्थ्य दर्शविते. ओष्ठसंपुट जरा उन्मीलित आहे; वाटतें कीं त्यांतून जिव्हाग्र व दंतपंक्तींतील एक दांत जरा दिसत आहे. रुद्राच्या मस्तकावर मुकुट आहे. ब्रह्मदेवाच्या मुकुटाहून हा उंचीला कमी आहे. त्याची ठेवणही वेगळी, रुद्राच्या स्वभावानुरूप आहे. मुकुटावर जागोजाग सर्पांचीं वेटोळीं आणि वर फणा काढलेला नाग आहे. कपाळपट्टीवर नरकपाल आहे आणि त्यासन्निध शंकराला प्रिय असलेलीं पानें-फुलें आहेत. रुद्राच्या उजव्या हातांत फणा काढलेला नाग आहे, जणुं त्याचा रुद्रावरच रोख आहे; आणि रुद्र जरा प्रेमानें, जरा कौतुकानें, जरा रोषानें, जरा बेफिकीरपणें, जरा हट्टानें त्याच्याकडे पाहत आहे! रुद्राच्या गळ्यांतही नाग असावा असें वाटतें; कारण रुद्र व ब्रह्मदेव यांचे मधोमध पाळीच्या पातळींत त्याची फणा उभारलेली दिसते.

विष्णूची मुद्रा प्रसन्न आहे. चेहऱ्याची ठेवण पार्वतीला साजेल अशी मृदु व नाजूक आहे. या मूर्तीचा मुकुट असा खोदलेला आहे कीं तो वजनांतही हलका असावा असें वाटावें! मुकुटाखालीं कुरळ्या केंसांच्या बटा रुळत आहेत; या बटांनीं कान झांकून गेलेले आहेत. मुकुटाला मोत्यांच्या माळा व घोंस आहेत; मुकुटाच्या वरच्या अंगाला उमललेलें कमल आहे. जणुं मुकुटाच्या मागच्या पोकळींतून तें आंतल्या कुरळ्या केंसांत खोंवलेलें आहे. विष्णूच्या उजव्या हातांत कमल आहे.

घारापुरीच्या त्रिमूर्तीच्या बाबतींत संशोधकानीं व्यक्त केलेलीं दोन मतें, एक – कीं या मूर्तींत ब्रह्मा, विष्णु व महेश यांचा समन्वय आहे,

आणि दुसरें—कीं हीं तिन्ही रूपें शंकराचींच आहेत; हीं दोनही ठाम नाहींत; कारण या मूर्तीशीं इतरांची तुलना करून कांहीं निष्कर्ष काढावा असें म्हटलें तर अशा मूर्ति इतरत्र नाहींत; आणि या मूर्तीवरील प्रतीकांचा कोणी तुलनात्मक अभ्यास केलेला नाहीं. प्रो. स्टेला क्रामरीश यांनीं या विषयावर अलीकडे एक लेख लिहिलेला आहे. हा लेख आणि त्याचे विद्यार्थी श्री. नियोगी यांनीं घेतलेलीं छायाचित्रें 'प्राचीन भारत' या सरकारी नियतकालिकांत प्रसिद्ध झालीं आहेत. या लेखांत त्यानीं सिद्ध केलें आहे कीं ब्रह्मा, विष्णु व महेश या त्रिमूर्तीची ही मूर्ति नसून तींत महादेवाचींच तीन रूपें दिग्दर्शित केलेलीं आहेत. या लेखाचा सारांश असा: "शंभूच्या वदनपंचकाचा तपशील विष्णुधर्मोत्तरांत सांगितलेला आहे. शंकराच्या पंचमुखी लिंगाला चार दिशांना चार मुखें असतात व तीं मध्यवर्ती लिंगाभोंवतीं खोदलेलीं असतात. आणि इतकीं मुखेंही खोदावीं लागत नाहींत. देवालयाच्या गाभाऱ्याला चार, तीन, दोन अगर एक, जितकीं द्वारें असतील तितकीं मुखें दाखविण्याचा प्रघात आहे. शंकराच्या तत्पुरुष या स्वरूपाच्या एका हातांत महालुंग (मातुलुंग, बीजपूरक) व दुसऱ्या हातीं अक्षमाला असते. मातुलुंग हें जीवनाच्या बीजाचें व अक्षमाला हें जीवनाच्या अखंडतेचें—पुनरुज्जीवनाचें प्रतीक. शंकराचें अघोर हें स्वरूप घोर, रुद्र, काळासारखें असतें; सर्प व अस्थिकपाल हीं त्याचीं प्रतीकें. शंकराचें वामदेव हें स्वरूप सुंदर, स्त्रियांना सुरम्य असें असतें. ईशान, तत्पुरुष, अघोर, वामदेव व सद्योजात या शंकराच्या पांच रूपांना सदाशिव, महादेव, भैरव, उमा व नन्दिन् अशा वैकल्पिक संज्ञा विष्णुधर्मोत्तरांत दिलेल्या आहेत. घारापुरीच्या त्रिमूर्तींत तत्पुरुष—महादेव मध्यें, डावीकडे अघोर—भैरव व उजवीकडे वामदेव—उमा हीं स्वरूपें दाखविलेलीं आहेत." या सर्व प्रतीकांवरून त्यांनीं निश्चित निर्णय काढला आहे कीं ही मूर्ति देवाधिदेव महादेवाचीच आहे.

आणि ज्यांचें मन पूर्वग्रहानें अगर अभिनिवेशानें दूषित झालेलें

नाहीं त्यांना हें समीकरण खात्रीनें समाधानकारक वाटेल. ही मूर्ति खोदण्यांत आली त्या वेळीं दत्तात्रेयाची कथा निर्माण झालेली असली तरी त्याची उपासना विशेष रूढ झालेली नव्हती. आपल्याकडील बहुजनसमाजाच्या मनांतील त्रिमूर्तीची कल्पना दत्तात्रेयाच्या मूर्तीवर आधिष्ठित झालेली आहे आणि ती अगदीं अर्वाचीन असल्यामुळें तिचा आरोप या प्राचीन मूर्तीवर करणें अयोग्य आहे.

मूर्तिकारानें ही मूर्ति किती कौशल्यानें घडविलेली आहे पहा. महादेवाच्या या तीन रूपांत केवढा फरक आणि तोही किती कौशल्यानें दाखविलेला आहे. प्रत्येकाचीं प्रतीकें वेगळीं आहेत; एवढेंच नव्हे तर त्यांच्या चेहऱ्यांची ठेवण वेगळी, मुखावरील आविर्भाव वेगळे, ज्या त्या मूर्तीच्या स्वभावानुरूप; ज्याचे त्याचे मुकुटही ज्या त्या स्वरूपाला साजतील असे कोरलेले आहेत; आणि सर्वांचे नेत्र मिटलेले असूनही भिन्न भाव व्यक्त केलेले आहेत, हें विशेष. जणुं अघोर-भैरवाला हा संसाराचा पसारा तुच्छ वाटत आहे, सामर्थ्याच्या मानवी वल्गनांबद्दल तिरस्कार वाटत आहे. तांडवाला सुरवात करून चित्-शक्तीचा हा खेळ उधळून देण्याची कल्पना तो आवरून धरीत आहे. तत्पुरुष–महादेव सृष्टीकडे अशा नजरेनें पाहत आहे कीं जणुं यजमान आपल्या आश्रिताच्या कर्तृत्वाचें कौतुक करीत आहे; त्याच्या मुद्रेंत पालकाचें प्रोत्साहन आहे, संरक्षकानें दिलेल्या अभयाचा कृतनिश्चय आहे. तर वामदेवाच्या मुखावर मातेचें वात्सल्य आहे, आशीर्वाद आहे; निर्माण व संहार या परस्परविरोधी शक्तींचा समन्वय केलेला आहे, अशा कौशल्यानें कीं प्रेक्षकाला त्यांमधील विरोध दिसावा, त्याचें सामर्थ्य भासमान व्हावें, पण त्यानें त्यामुळें निराश होऊं नये. त्याला वाटावें कीं सृष्टीवर संरक्षक शक्तीचा वरदहस्त आहे. हा विश्वास निर्माण व्हावा, म्हणूनच स्थितिशक्तीला मध्यस्थान देण्यांत आलें आहे असें वाटतें. डावीकडील नागराज हें संहाराचें प्रतीक तर उजवीकडील उत्फुल्ल कमल हें उत्पत्तीचें; विष दाहक तर सुगंध तोषक; सृष्टीच्या शक्तिबीजाचें धारण व रक्षण मात्र महादेवाच्या हातीं आहे आणि रुद्राच्या तांडवांतूनही

तो त्याचें रक्षण करील, हेंच सृष्टीच्या तीनही अवस्थांचें रहस्य. या दृष्टीनें पाहतां त्रिमूर्ति हेंच आमच्या संस्कृतीचें प्रतीक आहे. मनुष्य निरीश्वरवादी नसेल तर त्याला ही त्रिमूर्ति पाहतां असें वाटावें कीं जग नश्वर असलें तरी अशा शक्तींचा पाठिंबा व आशीर्वाद असल्यावर आपल्याला जगांत अशक्य व अजिंक्य असें काय आहे!

## अर्धनारीश्वर

त्रिमूर्तीच्या शेजारीं पूर्वेस अर्धनारीश्वराची मूर्ति आहे. अर्धनारीश्वर म्हणजे शिव – पुरुष, आणि उमा – प्रकृति, यांचा समन्वय; परस्परपूरक स्पंदन–शक्ति व संभव–शक्ति यांचा संयोग! उजवें अंग शिवाचें व डावें उमेचें. या मूर्तीची उंची सोळा फूट नऊ इंच आहे. शंकराचा जटाभार व पार्वतीचा केशसंभार, यांना जरतारी वस्त्रांत आच्छादून त्यांवर जडावाचा उंच मुकुट चढविलेला आहे असें वाटतें; कारण पार्वतीच्या स्कंधावर समल्याचा घोंस रुळतांना दिसतो. मुकुटाच्या दोन बाजूंची धाटणी भिन्न आहे. मुकुटाखालीं शंकराच्या गुंतलेल्या जटा व पार्वतीच्या कुरळ्या बटा दाखविलेल्या आहेत. शंकराच्या जटांमध्यें चंद्रकला आहे. शंकराच्या कानाची पाळी लांब व तींत एकच बाळी; तर पार्वतीच्या कानांत जडावाच्या कर्णफुलांची जोडी; शंकराचा हात नंदीला आवरीत आहे तर पार्वतीचा हात वस्त्र सांवरीत आहे; शंकराच्या दंडावर व हातांत जाड कडीं तर पार्वतीच्या दंडावर वांकी व हातीं जडावाचीं वलयें; शंकराच्या दुसऱ्या हातांत फणा काढलेला सर्पराज तर पार्वतीच्या हातांत वर्तुलाकार दर्पण!

अर्धनारीश्वराच्या मुख्य मूर्तीच्या मागें व आजूबाजूला अनेक मूर्ति आहेत. त्यांपैकीं कांहींचें वर्णन देतों. पार्वतीच्या मागें गरुडाच्या खांद्यावर बसलेला चतुर्हस्त विष्णु आहे. विष्णूच्या एका हातांत चक्र असून गरुडाच्या कपाळावर वैष्णव मुद्रा आहे. खालच्या बाजुला दोन दासी आहेत; एकीच्या हातीं चवरी आहे व दुसरीच्या हातांत पार्वतीच्या प्रसाधन–साहित्याची

मंजुषा आहे. तिच्या झुळझुळीत वस्त्राला अशा चुण्या दिलेल्या आहेत कीं त्यांमधून तिची हालचाल व्यक्त व्हावी. तिच्या उरोभागावर व दंडावर तिनें धारण केलेल्या कंचुकीच्या कडा स्पष्ट दिसतात. वरच्या बाजुला पश्चिमाधिपति मकरवाहन वरुण आहे; शंकराच्या मागें ब्रह्मदेव व इंद्र आहेत. चतुर्मुख ब्रह्मदेव कमलासनाधिष्ठित असून आसनाला पांच हंसांचा आधार आहे. त्याच्या हातांत कमल व कमंडलु, पळी व वेदग्रंथ आहेत. पूर्वाधिपति इंद्र ऐरावतावर आरूढ असून त्याच्या हातांत वज्र व अंकुश आहेत. ब्रह्मदेवाचे खालीं कार्तिकेय, हातीं शूलरूपी शक्ति धारण केलेला, आहे. मागल्या बाजूला अस्थिपंजरावस्थेंतील एक ऋषि आहे. गॅझेटीयर कर्त्यांनीं सांगितलेलें नसलें तरी हा भृंगी ऋषि आहे हें पुढें दिलेल्या कथानकावरून वाचकांच्या ध्यानीं येईल. या सर्व मूर्तींच्या वरल्या अंगाला दोन्ही बाजूंना अनेक उडते गंधर्वगण व अप्सरा आहेत; त्यांपैकीं कांहींच्या हातांत पुष्पमाला आहेत.

अर्धनारीश्वराची कथा शिवपुराणांत (अ० ४१) सांगितलेली आहे, ती अशी: ब्रह्मदेवानें प्रथम आपले मानसपुत्र पुरुष प्रजाप्रति निर्माण केले आणि त्यांना जीवसृष्टि निर्माण करण्याची आज्ञा दिली; परंतु त्यांना तें साधेना. तेव्हां ब्रह्मदेवानें महेश्वराचें ध्यान केलें आणि उग्र तप केलें. नंतर अर्धनारीरूप धारण करून शंकर त्याचे मस्तकांतून बाहेर पडला. त्यानें ब्रह्मदेवासुद्धां सर्व सृष्टि जाळून टाकली आणि उमेशीं योगसमागम करून ब्रह्मा, विष्णु वगैरे सर्व सृष्टि पुनः उत्पन्न केली.

गोपीनाथरावांनीं आणखी एक कथा दिली आहे. एकदां शिवपार्वती कैलास पर्वतावर बसलेलीं असतांना देव व ऋषि त्यांच्या दर्शनाला आले. सर्वांनीं प्रदक्षिणा घालून त्यांना वंदन केलें. भृंगी ऋषीनें मात्र प्रदक्षिणा घातली नाहीं व वंदनही केलें नाहीं. फक्त शंकराची पूजा करावयाची असें त्याचें व्रत होतें. हें अंतर्ज्ञानानें जाणतांच पार्वती क्रुद्ध झाली. तिनें शाप दिल्यामुळें भृंगीचें मांस नष्ट झालें व रक्त आटून गेलें. त्याला धड उभेंही राहतां येईना. त्याची ही



अवस्था पाहतांच शंकराला करुणा आली व त्यानें त्याला तोल सांभाळण्यासाठीं आणखी एक पाय दिला. लगेच भृंगी आनंदानें नाचूं लागला. यामुळें अधिकच क्रुद्ध झालेली पार्वती तपश्चर्येला निघून गेली. पुढें शंकर प्रसन्न झाले. तेव्हां त्यांच्या शरीराशीं एकरूप होण्याचा वर पार्वतीनें मागितला. शंकरानें तिची मागणी मान्य करतांच अर्धनारीश्वराचें रूप सिद्ध झालें. आतां तरी भृंगी आपणांस वंदन करील अशी तिची अपेक्षा होती; परंतु भृंगीनें भुंग्याचें रूप धारण करून अर्धनारीश्वरांतील शंकराच्या शरीराला भोंक पाडलें आणि त्यांतून तो फक्त शंकराला प्रदक्षिणा घालूं लागला. त्याची निष्ठा पाहून अखेरीस पार्वती त्याच्यावर प्रसन्न झाली व तिनें त्याला अनेक वरदानें दिलीं.

लिंगपुराणांतली कथा आणखी वेगळी असून केवळ भिक्षुकी वृत्तीची आहे. शंकर भिक्षावृत्तीनें राहत असता एकदां उत्तेजक पेयाच्या अतिरेकामुळें भिक्षेला जाऊं शकला नाहीं. दुर्गेनें जरा चमकावतांच शंकर भिक्षापात्र घेऊन बाहेर पडला आणि दुर्गा माहेरीं निघाली. वाटेंत तिला नारद भेटला. त्याच्या सूचनेवरून तिनें अन्नपूर्णा या नात्यानें सर्वांचा अन्नपुरवठा स्थगित केला. या नियंत्रणामुळें शंकराला कोणी भिक्षा वाढीना. नारदानें त्याला गांठलें व घरीं परत पाठविलें. दरवाजांत अन्नपूर्णेनें त्याचें स्वागत केलें आणि पंचपक्वान्नांचें भरपूर भोजन घालून तृप्त केलें. शंकरानें प्रसन्न होऊन अन्नपूर्णेला इतकें गाढ आलिंगन दिलें कीं तीं दोघें एकरूप झालीं.

शास्त्रीय दृष्टीचा टेंभा मिरविणाऱ्या आधुनिक वाचकांना या कथा हास्यास्पद व अनैसर्गिक वाटण्याचा संभव आहे. त्यांचें समाधान करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. ग्रीक पुराणांत हर्माफ्रोडिटस्ची कथा आहे. हा हर्मिस् व अफ्रोडीट यांचा पुत्र. हर्मिस् हा ग्रीक देवतांचा अग्रदूत आणि अफ्रोडीट ही सौंदर्य व संभव यांची देवता. तो एका जलाशयाच्या कांठीं विश्रांति घेत असतांना तेथील जलदेवता त्याच्यावर

मोहित झाली. तिच्या प्रार्थनेवरून देवांनीं त्या दोघांना एकरूप केलें, अशा रीतीनें कीं अर्धे शरीर त्याचें व अर्धे तिचें. खि. पू. चवथ्या शतकांत पॉलीक्लस या अथीनियन शिल्पकारानें खोदलेली त्यांची मूर्ति विख्यात आहे. स्कॅन्डेनेव्हिया, इजिप्त, इराण, सीरिया, फ्लीजिया, तिबेट वगैरे देशांतही याच स्वरूपाच्या कथा व देवता आहेत. मूळची कल्पना मात्र सर्वांनीं हिंदुस्थानपासून उचललेली आहे. वनस्पति-शास्त्रानें व प्राणिशास्त्रानें अयोनिसंभवाचें सत्य प्रस्थापित केलें आहे. ऑर्किड जातीच्या पुष्पांत स्त्रीकेसर व पुंकेसर भिन्न नसतात. बीजकोश व अंडकोश दोन्हीही धारण करणारी एक मत्स्यजात आहे. फुलपांखरांच्या कांहीं जाती अर्धनारी असतात. सरोनस जातीचे मत्स्य स्वसंभूत असतात असें सिद्ध झालेलें आहे. पुरुषाचा स्तन हा अर्धनारी अवस्थेचा अवशेष आहे असें कांहीं शास्त्रज्ञ मानतात. अशा निरीक्षणाच्या व शास्त्रीय ज्ञानाच्या आधारानेंच प्राचीन आचार्यांनीं अर्धनारीची कल्पना उत्क्रांत केली व संभवाचें रहस्य सोडविण्याचा एक प्रयत्न केला. धर्मगुरूंनीं या कल्पनेच्या आधारानें अर्धनारीश्वराची मूर्ति उत्क्रांत केली आणि संभवाचें प्रतीक म्हणून रूढ केली. यांत अशास्त्रीय असें कांहीं नाहीं आणि हास्यास्पदता तर कांहींच नाहीं. तत्त्वज्ञानाच्या दृष्टीनें तर पुरुष व प्रकृति या दोन मूल तत्त्वांची अभेद्यता किंवा एकरूपता दर्शविण्यासाठीं ही प्रतीकमूर्ति निर्माण करण्यांत आली असें म्हणतां येण्याजोगें आहे.

प्राचीन व मध्ययुगीन संस्कृत ग्रंथांत अर्धनारीश्वराच्या मूर्तींचा तपशील दिलेला आहे. श्री. खरे यांनीं मूर्तिविज्ञानांत त्याचा सारांश दिला आहे. मूर्तीचा उजवा भाग शिवाचा, असें सर्व आधारग्रंथ सांगतात; आणि येथें तशीच स्थिति आहे. अभिलषितार्थचिंतामणि, मत्स्यपुराण वगैरे ग्रंथांत सांगितलें आहे कीं पार्वतीचे हातीं दर्पण असावा; तसा तो येथें आहे. शंकराचे कपाळावर त्याचा तृतीय नेत्र अर्धा दाखवावा, उजवी दृष्टि रौद्र आणि डावी नजर शीतल असावी, असें कांहीं ठिकाणीं सांगितलेलें आहे. तशी स्थिति येथें नाहीं. दगडी

मूर्तींना मातीचें घोटीव लुकण लावून त्यावर रंग चढविण्याची प्रथा होती असें या वर्णनांवरून दिसतें. कारण, शंकराचा रंग आरक्त व पार्वतीचा वर्ण श्यामल असावा, पार्वतीच्या भांगांत शेंदूर, डोळ्यांत काजळ व पावलांना अळिता असावा, असे तपशील आधारग्रंथांत दिलेले आहेत. घारापुरीच्या मूर्तींवर रंग चढविलेले होते. याला मध्ययुगीन प्रवासवर्णनांत आधार सांपडतात, इतकेंच नव्हे तर जागोजाग रंगांचे अवशेषही दिसतात. अर्धनारीश्वराची मूर्ति खोदण्यांत शिल्पकारानें जेवढें कौशल्य दाखविलेलें आहे तेवढें तीं रंगविणारानेंही दाखविलें असलें पाहिजे असें गृहीत धरलें तर ही मूर्ति त्या स्थितींत किती सुंदर दिसत असेल याची कल्पनाही करवत नाहीं.

घारापुरीच्या मूर्तीचें सौंदर्य समजण्यासाठीं तिची तशाच मूर्तीशीं तुलना करून पाहिली पाहिजे. बदामीच्या लेण्यांत अर्धनारीश्वराची मूर्ति आहे. तिचा आकार येथील मूर्तीच्या निम्मा आहे; आणि ती इतकी बेढब आहे कीं ती खोदतांना आपण एखाद्या कृत्रिम व अनैसर्गिक कल्पनेला मूर्त स्वरूप देत आहोंत अशी शिल्पकाराला जाणीव असल्यामुळें त्यानें ती आंखडत्या हातानें खोदली असावी असें प्रेक्षकाला वाटतें. आणि येथें ! येथील मूर्ति मूळ कल्पनेशीं तद्रूप होऊन खोदलेली आहे.

## त्रिवेणी-संगम

त्रिमूर्तीच्या शेजारीं पश्चिमेस असलेल्या मूर्तीला गॅझेटीयरमध्यें शिव-पार्वती असें नांव दिलेलें आहे; तर कांहीं लेखकांनीं तिला गंगाधर आणि गंगावतरण हीं अभिधानें दिलीं आहेत. यांपेक्षां त्रिवेणी-संगम ही संज्ञा मला अधिक अन्वर्थक वाटते.

ह्या चित्रपटाची चौकट तेरा फूट रुंद व सतरा फूट उंच आहे व ती अडीच फूट उंचीच्या चौथऱ्यावर खोदलेली आहे; त्यांतील शिवाची उंची सोळा फूट व पार्वती बारा फूट चार इंच उंच आहे.

शंकराच्या चार हातांपैकीं डावीकडील दोन्ही हात मोडलेले आहेत.

पुढील उजवा हात अवधान वेधण्यासाठीं उचलून धरलेला आहे ; मागल्या हाताला नागाचा विळखा असून त्याची फणा खांद्याजवळ आहे. त्याचा पुढला डावा हात त्याच्या शेजारीं उभ्या असलेल्या बुटक्या गणाच्या मस्तकावर ठेवलेला असुन मागल्या हाताची तर्जनी पार्वतीच्या हनुवटीवर आहे. शंकराच्या जटाभारावर त्रिधारी मुकुटाचें आच्छादन असून त्याच्या शिखरांतून त्रिमुख–स्त्रीची अर्धमूर्ति दाखविलेली आहे. हीं मुखें गंगा, यमुना व सरस्वती या तीन पवित्र नद्यांचीं प्रतीकें असावींत असें अनुमान करण्यांत आलें आहे. या तीन नद्यांचा प्रयाग येथील त्रिवेणी - संगम विख्यात आहे. जणुं या तीन मूर्तींच्या भारानें शिवाचें शिर जरा कललेलें आहे. शेजारीं पार्वती उभी आहे. शंकर तिला लाडानें जवळ घेण्याचा यत्न करीत आहे व ती लज्जेनें जरा दूर सरकण्याच्या प्रयत्नात आहे. तिच्या कुरळया केंसांवर मुकुट आहे व मागें मत्याळी धर्तीचा अंबाडा बांधलेला आहे. कुण्डलांपासून नूपुरांपर्यंत ती अलंकारांनीं नटलेली आहे व झुळझुळीत वस्त्र ल्याली आहे. तिच्या शेजारीं तिच्या प्रसाधन - साहित्याची पट्ट्यांत बांधलेली मंजूषा धारण करणारी दासी उभी आहे.

स्त्री ही नेहमीं अशीच जवळ येण्याला उत्सुक असतांही दूर सरण्याच्या प्रयत्नांत असते !

पार्वतीच्या देहाला त्रिभंगाचा बांक असून फक्त स्कंधाचें अग्र शंकराला अनुकूल आहे. ती आतां शंकराकडे सरकेल असें वाटतें आणि आतां त्याचा हात लीलेनें उडवून पलीकडे सरकेल असेंही वाटतें. लालित्यानें नटलेल्या प्रेमाचा कल कोणीकडे, कसा व केव्हां झुकेल हें कोण सांगणार? पार्वतीच्या उजव्या हातावर तिचें उपवस्त्र आहे. त्याचा पदर घोंट्यापर्यंत लोंबता आहे. तिच्या वस्त्राच्या चुण्यांना जागोजाग असें बांक दिलेले आहेत कीं त्यांमुळें तिच्या अवयवांना जणुं गति प्राप्त झालेली आहे असें वाटतें.

शंकराचे पाठीमागें चार हातांचा ब्रह्मदेव, कमलासन व हंसवाहन ; आणि ऐरावतावर आरूढ झालेला इंद्र ; यांच्या मूर्ति नेहमींचीं आयुधें

हातीं घेतलेल्या अशा आहेत. पार्वतीचे पाठीमागें गरुडावर बसलेला विष्णु आहे. ब्रह्मदेवाशेजारीं एका राजाची प्रतिमा आहे. तो गुडघ्यावर वांकलेला असून त्याचे दोन्ही हात छातीवर आहेत. संशोधकांचा कयास आहे कीं ही एखाद्या राजाची प्रतिमा असावी, कीं ज्याच्या आज्ञेनें वा आश्रयानें हें शिल्पकृत्य खोदण्यांत आलें. या विधानाला अस्तिपक्षीं पुरावा कांहीं नाहीं. भगीरथाच्या प्रयत्नानें गंगा पृथ्वीवर अवतरली व तिचा ओघ शंकरानें मस्तकीं धारण केला अशी कथा आहे. या कथेच्या अनुरोधानें ही मूर्ति भगीरथाची असावी असें मानण्यास जागा आहे.

श्री. वकील यांनीं या मूर्तीला 'गंगावतरण' हें नांव दिलें आहे; पण प्रत्यक्ष मूर्तींत अवतरण नाहीं, फार तर धारण आहे, म्हणून हें नांव अन्वर्थक नाहीं. प्रो. क्रामरीश यांनीं 'गंगाधर–शिव' हें नांव दिलें आहे. श्री. खरे यांनीं मूर्तिविज्ञानांत गंगाधर मूर्तीचा तपशील दिला आहे. त्यांनीं आधाराला घेतलेल्या कोणत्याही ग्रंथांत शंकराच्या जटांत त्रिमुख देवता असल्याचा उल्लेख नाहीं. गंगा, जान्हवी व सरस्वती या तिघी एकदम पृथ्वीतलावर अवतरल्या अशी कथाही नाहीं. म्हणून या शिल्पाला त्रिवेणी-संगम हेंच नांव योग्य आहे असें वाटतें; पण या नांवाचे बाबतींत अडचण आहे ती ही कीं या तिघींचा संगम शंकरानें शिरीं धारण केल्याची कथा नाहीं. एवढें मात्र खरें कीं या संगमानंतर पुढें वाहणाऱ्या नदीला गंगा हेंच नांव आहे.

## मानवती पार्वती

या चित्रांत शिव व पार्वती यांचा कलह दाखविलेला आहे. कैलास पर्वतावर शंकर व पार्वती बसलेलीं आहेत. शंकराचे चारी व पार्वतीचे दोन्ही हात तुटलेले आहेत. शंकराचा मुकुट फुटलेला आहे आणि बैठकीच्या खालच्या अंगाला दोघांचेही पाय मोडलेले आहेत. तरी शंकराचें जानवें व पार्वतीचें वस्त्र हीं स्पष्ट दिसतात. शंकराचेमागें चामरधारी पुरुष व चरणांजवळ अस्थिपंजरावस्थेंत भृंगी ऋषि आहे.

शंकराच्या डाव्या बाजूला पार्वती रुसून मान फिरवून बसलेली आहे. तिच्या मागल्या बाजूला एक स्त्री कडेवर मूल घेऊन उभी आहे. खालच्या बाजूला नंदी आहे. वरच्या बाजूला खडक फोडून कैलास पर्वताचीं शिखरें व ढग दाखविलेले आहेत. उडते गंधर्व व अप्सरा शिव-पार्वतींवर पुष्पवृष्टि करीत आहेत. एका गंधर्वाचे हातीं असलेली फुलांची परडी लक्षपूर्वक पाहण्याजोगी आहे. या चित्रांचा अर्थ नीट लावतां येत नाहीं. शंकर व पार्वती यांचे कलह अनेकदां झालेले असल्यामुळें आणि या चित्रांत सती मान फिरवून बसलेली असल्यामुळें यांत त्यांचा रुसवा दाखविलेला असावा असें मानण्यांत येतें.

## विवाहमङ्गल

सती उमा ही शिवाची प्रथम पत्नी. दक्षानें यज्ञप्रकरणांत शंकराचा अपमान केल्यामुळें सतीनें आत्महत्या केली व हिमालयाच्या पोटीं जन्म घेतला. ती पर्वताचे पोटीं आली, म्हणून पार्वती. ती वयांत आल्यावर नारदांनीं भविष्य वर्तविलें कीं ती शंकराशीं विवाहबद्ध होणार. तेव्हा पित्याच्या प्रेरणेनें ती शिवप्राप्तीसाठीं तप करूं लागली. इकडे शंकरानेंही सतीच्या विरहामुळें त्रस्त होऊन तपश्चर्या सुरू केली होती. तारकासुरानें देवांना त्रस्त केलें; त्याचा वध शंकराच्या पुत्राच्या हातून व्हावयाचा होता. आणि शंकर तर तपश्चर्या करीत होता. देवांनीं शंकराला विद्ध करण्याची कामगिरी कामदेवावर सोंपविली. त्यानें आपलें काम केलें, पण बिचारा कामदेव मात्र समाधिभंगामुळें संतप्त झालेल्या शंकराच्या क्रोधानलानें दग्ध झाला. शंकरावर अनुरक्त असलेल्या पार्वतीनें शंकराची सेवा करून त्याची प्रीति संपादन केली. तिला मागणी घालण्याकरतां शंकरानें हिमालयाकडे सप्त ऋषि पाठविले. हिमालयानें ही मागणी मान्य केल्यानंतर त्यांचा विवाह झाला. यामुळें सर्व देवांना संतोष झाला व ते विवाह-समारंभाला हजर राहिले. तो प्रसंग या चित्रांत दाखविलेला आहे.

घारापुरीच्या चित्रपटांत हें चित्र सर्वोत्कृष्ट आहे. पार्वतीच्या मूर्ती-बद्दल बर्गेस यांनीं निर्वाळा दिला आहे कीं येथील सर्व मूर्तींमध्यें ही

अत्यंत 'प्रमाणबद्ध व बांधेसूद' असून ती निर्माण करण्यांत शिल्पकारांनीं आपलें कौशल्यसर्वस्व वेंचलें आहे. दुर्दैवानें या शिल्पाचीही बरीच मोडतोड झालेली आहे.

शंकराच्या चार हातांपैकीं तीन अर्धवट तुटलेले आहेत आणि उजवा पाय सबंध मोडलेला आहे. जटाभारावर उंच मुकुट आहे. मुकुटावरील नक्षीचें खोदकाम बारकाईनें व काळजीपूर्वक केलेलें आहे. पाठीमागल्या बाजूला प्रभावलय आहे. शंकराच्या वस्त्राचा सोगा कमरेभोंवतीं गुंडाळून गांठीचा पदर खालीं लोंबता सोडलेला आहे. एक हात या गांठीवर ठेवलेला आहे. त्याच्या गळ्यांत अलंकार व जानवें आहे.

पार्वतीची मूर्ति आठ फूट सहा इंच उंचीची असून तिचें शिर शिवाच्या स्कंधाइतकें उंच आहे. पार्वती शंकराच्या उजव्या बाजूला आहे. पत्नीला उजवीकडील जागा फक्त विवाहाच्या वेळीं देण्यांत येते. तिच्या शिरावरील मुकुट जडावाचा असून त्याचा अग्रभाग मोत्यांच्या जाळीसारखा व पृष्ठभाग जरा उंच व वर्तुलाकार आहे. मुकुटाखालून बाहेर पडणाऱ्या केशभाराचा अंबाडा तिच्या डावीकडे दिसत आहे. सात्त्विक प्रीतीच्या लहरीनें तिचें मुख जरा डावीकडे, शंकराकडे कललेलें आहे. कानांत कर्णफुलें व कुण्डलें आहेत आणि गळ्यांत अनेक हार आहेत; त्यांपैकीं एकाचा घोंस स्तनद्वयामधून कमरेपर्यंत रुळत आहे. उर्ध्वभाग वस्त्ररहित आहे आणि अधोभागावरील वस्त्र फक्त चुण्यांच्या रूपांत दिसत आहे. तिचे दोन्ही हात तुटलेले आहेत. तिचा उजवा हात शंकराच्या डाव्या हातांत होता असें त्यांच्या ठेवणीवरून दिसतें. वेरूळ येथील रामेश्वर लेण्यांत हाच प्रसंग खोदलेला असून तेथें शिवानें पार्वतीचा हात धरलेला आहे.

पार्वतीच्या मागें तिचा पिता उभा आहे. त्याचा उजवा हात तिच्या स्कंधावर अगदीं हलुवार ठेवलेला असून तो जणुं तिला पुढें सरण्याबद्दल, जरा प्रेमानें व जरा आर्तवृत्तीनें, प्रोत्साहन देत आहे. पार्वतीचे

उजवीकडे सालंकृत चामरधारिणी आहे. तिच्या कानांत लोंबती कुंडलें व डावे हातीं निऱ्यांचा घोळ सांवरून धरलेला आहे.

शंकराचे बाजूला त्रिमुख ब्रह्मदेव कांहीं वैवाहिक विधि करीत उकिडवा बसलेला आहे. हा या विवाह - मङ्गलाचा पुरोहित. त्याचे मागें चतुर्हस्त विष्णु उभा आहे. त्याचे उजवे हातीं कमळ व डावे हातीं चक्र आहे. त्याचें वर्तुलाकार शिरस्त्राण विशेष लक्षपूर्वक पाहण्यासारखें आहे. अगदीं उजवीकडे एक स्त्री उभी आहे. ती बहुधा पार्वतीची माता मेना असावी. चामरधारिणीचे मागें चंद्र उभा आहे. त्याचे हातीं अमृतकुंभ आहे. पाश्चात्य न्यायालयांत न्यायाधीश व वकील कृत्रिम केशभार धारण करतात; तसाच केशभार चंद्राच्या मस्तकावर आहे. शिव-पार्वतींच्या वरच्या बाजूला अनेक सिद्ध, गंधर्व व अप्सरा आकाशातून विवाहित जोडप्यावर पुष्पवृष्टि करीत आहेत.

या चित्रावर शिल्पकारांनीं इतकें कौशल्य केंद्रित केलें आहे कीं त्यावरून फर्ग्युसन या शिल्पज्ञाची समजूत झाली कीं या लेण्याची मांडणी विवाह-मंडपाची आहे! शंकरपार्वतीच्या विवाहाचें वर्णन कालिदासानें कुमार-संभवांत केलेलें आहे, तें रसिक वाचकांनीं मुद्दाम वाचून पाहावें. कालिदासाच्या वर्णनांवरून हें शिल्प तयार करण्यांत आलें कीं हें शिल्प आदर्श मानून कालिदासानें वर्णनें लिहिलीं याचाही मनाला क्षणभर भ्रम पडतो. कालिदास हा जसा भारताचा महाकवि तसेंच हें भारताचें उत्कृष्ट शिल्प, अशी या तुलनेवरून खात्री पटते. फुटल्या तुटल्या स्थितींतही हें शिल्प प्रेक्षकाला तन्मय करतें; मग त्यावर रंग चढविलेले असतील तेव्हां त्यानें किती रसिकांचें देहभान हरपविलें असेल याची कल्पनाही करतां येत नाहीं. अंगसौष्ठवाबद्दल, मनोविकारांचा मुद्रेवर आविष्कार करण्याबद्दल, अवयवांच्या धारणेनें मनोभावना प्रकट करण्याच्या कौशल्याबद्दल विख्यात असणाऱ्या अनेक तरुण-तरुणींनीं व नटनटींनीं या चित्रासमोर उभें राहून तेच आविर्भाव धारण करण्याचे प्रयत्न अनेक वेळां केलेले आहेत व त्याचीं छायाचित्रें प्रसिद्धही

…लेलीं आहेत. त्यांवरून दिसून येतें कीं या सजीव मूर्तींहून त्या …षाणमूर्ति अधिक सजीव, सशब्द व सौष्ठवपूर्ण आहेत! आणि हें …व्हां, तर ही मूर्ति विच्छिन्नावस्थेंत असतांना!

शंकराचा सव्य हस्त पार्वतीच्या डाव्या हाताशीं कसा संलग्न झाला असेल ? पुरोहितानें सांगितलें असेल, हाताला हात लावा. तत्क्षणीं पार्वती पुलकित झाली असेल. म्हणूनच पिता तिला धीर देत आहे, प्रोत्साहन देत आहे. शंकरानें पुढें केलेल्या हाताला तिनें अंगुलिस्पर्श केला असेल नसेल, इतकेंच. आणि तेवढ्या स्पर्शानें ती थरारून गेलेली दिसत आहे. दांड्यावर कमल कलतें तसें व तेवढेंच तिचें मुख झुकलेलें आहे.

शिवपार्वती–विवाहप्रसंगावर आधारलेल्या मूर्तींना मध्ययुगीन ग्रंथांत कल्याणसुंदर हें अभिधान दिलेलें आहे. होमकर्ता व होमोन्मुख ब्रह्मा, उदकदाता विष्णु यांची उपस्थिति ; डावा पाय स्थिर व उजवा आकुंचित ; देवाच्या उजवीकडे देवी — हे या वर्णनांतील तपशील या शिल्पाशीं जुळतात. गया व राजशाही येथील कल्याणसुंदर मूर्तींचीं छायाचित्रें श्री. खरे यांनीं दिलेलीं आहेत. घारापुरीच्या मूर्तींशीं त्यांची तुलना करून पाहिली तर त्या किती बेढब व कृत्रिम आहेत हें तावडतोब दिसून येतें.

## भैरव–महाकाल

भैरवाची मूर्ति साडेअकरा फूट उंचीची आहे. त्याच्या आठ हातांपैकीं फक्त तीन आतां अस्तित्वांत आहेत. त्यांवर अलंकार आहेत. उचललेला डावा पाय थोडासा दिसत असून खालचा बाकीचा सर्व भाग तुटून गेलेला आहे. मस्तकावर मुकुट, नाग, नरकपाल व चंद्रकला आहेत. मुद्रा क्रुद्ध आहे ; भिंवया आंखडलेल्या आहेत ; डोळे तारवटलेले आहेत ; दांत घट्ट आंवळून धरलेले असून सुजलेल्या ओठांतून एक दात बाहेर निघालेला दिसत आहे. गळ्यांत रुण्डमाला आहे. एका हातांतील भाला एका व्यक्तीच्या शरीरांत खुपसलेला असून

त्यावर तें शरीर अधांतरीं लटकत आहे. हें शरीर विच्छिन्न झालेलें आहे. एका हातीं रुंद पात्याची तरवार आहे. वर उचललेल्या दोन हातांत गजचर्म आहे. चामडें कमावतांना हत्तीची सोंड व सुळे शाबूत ठेवलेले आहेत. एका हाताला नागराजाचा विळखा असून त्यांत भिक्षापात्र आहे ; जणुं भाल्यानें विद्ध झालेल्या शरीरांतून ठिबकणारें रक्त त्या पात्रांत धरलें जात आहे. आणखी एका हातांत घंटा धरलेली आहे. खालच्या बाजूला एक चामरधारिणी स्त्री असून तिच्याजवळ सतीच्या आकृतीचा अवशेष आहे. मुख्य मूर्तीच्या खालीं व आजुबाजूला आणखी कांहीं स्त्रीपुरुषांच्या मूर्तीचे भग्न भाग आहेत; आणि मागच्या बाजूला असलेल्या लिंगाला कोणी साष्टांग तर कोणी नमून, वंदन करीत आहेत.

वेरूळच्या सीतास्नान लेण्यांत अशीच भैरवमूर्ति आहे. हातांतील आयुधांच्या बाबतींत दोहोंत थोडाबहुत फरक आहे, इतकेंच. शिवाय, वेरूळची मूर्ति शाबूत आहे आणि येथील विच्छिन्न आहे. येथील भैरवमूर्तीचे हातपाय पोर्तुगीजांनीं सोळाव्या शतकांत तोडल्याचें इतिहासांत नमूद आहे. शंकराला दक्षानें यज्ञाचें आमंत्रण दिलेलें नाहीं, हें पार्वतीनें खिन्नपणें सांगितलें तेव्हां क्रुद्ध झालेल्या शंकरानें भैरवाचें रूप धारण केलें आणि संहार-नृत्य आरंभिलें. शिवाचें हें रूप पाहतांच पार्वतीचा थरकांप उडाला. कोणी सांगतात कीं शंकरानें कापालिक व्रत घेतलें होतें तेव्हांचें त्याचें हें स्वरूप आहे. वीरभद्राच्या उत्पत्तीचा दक्षयज्ञाशीं संबंध आहे. दक्षानें यज्ञमंडपांत प्रवेश केला तेव्हां सर्वांनीं उभें राहून त्याचें स्वागत केलें, पण ब्रह्मदेव व महादेव हे बसून राहिले. दक्षानें ब्रह्मदेवाला वंदन केलें पण महादेवाचा अपमान केला. दुसऱ्या यज्ञांत दक्षानें सतीचा अपमान केल्यामुळें तिनें आत्महत्या केली, हें समजतांच शंकरानें आपली एक जटा उपटून तींतून भयानक वीरभद्र निर्माण केला व त्याच्याकडून दक्षयज्ञाचा विध्वंस करविला. नंतर दक्ष शंकराला शरण आला. गॅझेटीअरकारांनीं या मूर्तीला भैरव आणि वीरभद्र अशीं वैकल्पिक नांवें दिलीं आहेत. मध्ययुगीन शिल्पग्रंथांत वीरभद्राचीं जीं चिन्हें दिलीं आहेत तीं या मूर्तीशीं मुळींच जुळत नाहींत.

ही मूर्ति अन्धकासुरमर्दन शिवाची आहे असें श्री. खरे यांनीं नमूद केलें आहे. पार्वतीच्या अभिलाषानें अन्धकासुरानें शंकराशीं युद्ध आरंभिलें. युद्धांत त्याच्या प्रत्येक थेंबापासुन राक्षस उत्पन्न होऊं लागले. तेव्हां रक्त पिण्यासाठीं शंकरानें सप्तमातृका उत्पन्न केल्या. रक्तपानानें त्या तृप्त झाल्या, पण नवे राक्षस निर्माण होण्याचें थांबेना. म्हणून विष्णूच्या मदतीनें शंकर त्यास भाल्यानें मारणार तोंच त्यानें शंकराची स्तुति केली. तेव्हां शंकरानें त्याला आपल्या गणांचें आधिपत्य दिलें आणि त्याला भृंगीश हें नांव दिलें. त्यांच्या मतें भाल्याच्या फळावर लटकणारा अन्धकासुर आहे.

हें शिल्प लक्षपूर्वक न्याहाळून पहा, म्हणजे मूर्तीच्या अंगप्रत्यंगांतून ओसंडणारें पुरुष-सामर्थ्य प्रत्ययाला येईल आणि भारतीय शिल्पाच्या चलशक्तीचें प्रत्यंतर येईल. क्रोधानें बेभान होऊन शंकर संहारनृत्य करीत आहे, त्याच्या गळ्यांतील नरकपालांचा हार इतस्ततः उडत आहे ; तीं कपालें एकामेकावर आपटून संहार-संगीताचा ताल धरीत आहेत, जणुं भावी संहाराच्या कल्पनेनेंच तीं सशब्द झालीं आहेत, खदखदां हांसत आहेत! शंकराच्या हातांतील अस्त्रांच्या प्रहारानें चोहींकडे रक्ताच्या चिळकांड्या उडत आहेत आणि त्यामुळें शंकराचें नृत्य अधिकच भयानक व संहारक होत आहे!

## रावणानुग्रह

कैलास पर्वतावर शिवपार्वती बसलेलीं आहेत. शंकराच्या मुकुटांत चंद्रकला व मागें प्रभा आहे. त्याच्या मुद्रेवर शांत निश्चय व कपाळावर तृतीयनेत्र स्पष्टपणें दिसत आहेत. त्याचे आठही हात मोडलेले आहेत ; एकांतील त्रिशूळ मात्र दिसत आहे. शंकराचे शेजारीं घाबरलेली पार्वती बसलेली आहे. एका हातानें शंकर तिला आधार व निर्भयतेचें आश्वासन देत आहे. शंकराचे पायाजवळ भृंगी, त्याचे डावीकडे गणपति ; शिवपार्वतीचे दोन्ही बाजूंना द्वारपाल ; वरल्या बाजूस अनेक गण, कैलास पर्वतावरील शंकराच्या बैठकीखालीं दशमुख रावण व

त्याच्याभोंवतीं त्याचे साथीदार राक्षस, अशी या शिल्पाची मांडणी आहे. रावणाचीं दहा तोंडें व वीसही हात विच्छिन्न आहेत. तो प्रेक्षकांकडे पाठ करून बसलेला आहे व कैलास पर्वत उचलण्याच्या प्रयत्नांत आहे. पण बिचारा शंकराच्या पायाच्या दाबानें चिरडून गेला आहे.

या प्रसंगाचा आधार अनेक कथांवर आहे. कैलास पर्वतावर शंकराचा पार्वतीशीं कलह झाला. त्या वेळीं रावण कैलासाजवळून जात होता. कैलासानें त्याचा मार्ग अडविल्यामुळें तो चिडला. त्यानें डोंगर गदगदां हालविला, यामुळें घाबरलेली पार्वती शंकराला बिलगली. शंकरानें पायानें पर्वत दाबला व रावणाला चिरडून हतबल केलें. नंतर रावणानें आपल्या हृदयाच्या तांतींचा वीणा करून ती वाजवून दहाही मुखांनीं शंकराची प्रार्थना केली; तेव्हां त्याची सुटका झाली. कोणी सांगतात कीं शंकरानें रावणाला चिरडलें; कोणी सांगतात कीं त्याच्या कृत्यामुळें शंकराचा पार्वतीशीं समेट झाला, म्हणून शंकरानें रावणावर अनुग्रह केला.

## ताण्डव

शिवताण्डवाचे दृश्याची रुंदी आंतल्या अंगानें तेरा फूट असून उंची सुमारें सव्वाअकरा फूट आहे. मध्यवर्ती शिवमूर्तीची उंची सुमारें पावणेअकरा व बाजूच्या पार्वतीची सुमारें पावणेसात फूट आहे. शिवमूर्तीला आठ हात होते. ते सर्व पुढेंमागें मोडलेले आहेत. दंडांवरील अलंकार स्पष्ट दिसत आहेत. पुढला उजवा हात छातीवरून डावीकडे गेलेला आहे; चवथ्या उजव्या हातीं खट्वांग – भोंवतीं नाग गुंडाळलेला सोटा, असावा. तिसरा डावा हात पार्वतीचे मुखाकडे वळलेला असावा. शंकराचा मुकुट उंच असून त्यावरील खोदकाम फार बारकाईनें काळजीपूर्वक केलेलें आहे. कमरेभोंवतालचा पट्टा वस्त्राला जोडलेला असावा असें दिसतें. उजवा पाय मांडीवर मोडलेला असून दुसरा पूर्णपणें नष्ट झालेला आहे. पार्वती शंकराचे

डावीकडे असून तिची मूर्ति विच्छिन्न आहे. तिचे अंगावर ठळक अलंकार आहेत. मागल्या बाजूला गरुडारूढ शंखचक्रधारी विष्णु,



ऐरावतावर इंद्र, हंसारूढ ब्रह्मदेव आहेत. ब्रह्मदेवाला तीन मुखें व चार हात आहेत. उंच टोपी घातलेला कार्तिकेय वरच्या बाजूला असून त्याच्या शिरस्त्राणावर लटकावलेल्या नरकपालाच्या एका नेत्रांतून सर्प बाहेर निघत आहे. शिवाच्या उजवीकडे गणपति आहे. त्याच्या उजव्या हातांत सोटा व डाव्या हातात हत्तीचा सुळा आहे.

वीणा वाजविणारी स्त्री आणि आकाशांत वावरणारी अप्सरा यांच्या मूर्ति बारकाईनें पाहण्यासारख्या आहेत.

ताण्डवनृत्याचे १०८ प्रकार असल्याचें भरताच्या नाट्यशास्त्रांत नमूद केलेलें आहे. मद्रास प्रांतांतील मंदिरांमध्यें ठिकठिकाणीं वेगवेगळ्या मुद्रेच्या ताण्डवमूर्ति आहेत. त्यांना चार ते दहा हात असतात आणि त्यांत शिल्पशास्त्राच्या नियमांनुसार वेगवेगळीं अस्त्रें असतात. ताण्डव हा नृत्यप्रकार शंकरानें पार्वतीच्या रंजनासाठीं निर्माण केला आणि तो प्रथम आपल्या तण्डु नांवाच्या गणाला शिकविला, म्हणून त्याला ताण्डव हें नांव मिळालें.

ही मूर्ति इतकी छिन्नविच्छिन्न झालेली आहे कीं तिच्या आजच्या स्वरूपावरून मूळच्या सौंदर्याची मुळींच कल्पना करतां येत नाहीं. शरीरासमोर आलेला हात व उचललेली मांडी यांवरून नृत्याच्या अवसानाचा अंदाज मात्र बांधतां येतो. मूर्ति दगडांत खोदलेली आहे, म्हणून नव्हे तर तिनें हा विशिष्ट आविर्भाव केला आहे, म्हणूनच तिचा तोल सांभाळला गेला आहे! आणि अवयवांनींही या अवसानाचा तोल सांभाळला आहे असें वाटतें. या नृत्याची भैरवाच्या नृत्याशीं तुलना करून पाहिली म्हणजे संतोषनृत्य व संहारनृत्य यांतील फरक चट्कन् ध्यानीं येतो.

## महायोगी शिव

या शिल्पाची मोडतोड फार झालेली असल्यामुळें आणि कांहीं इतर कारणांमुळें—जीं पुढें नमूद केलेलीं आहेत—त्याचें स्पष्टीकरण करणें जरा अवघड आहे.

शंकराला फक्त दोन हात आहेत व ते दोन्ही मोडलेले आहेत. मूर्ति पद्मासनस्थ आहे. आसनाच्या कमळाचा दांडा नागद्वयानें धरलेला आहे. शंकराची मुद्रा शांत, विचारग्रस्त असून नेत्र मिटलेले आहेत. या चिन्हांवरून तर्क करण्यांत आला आहे कीं ती खोदतांना शिल्पकारांनीं बुद्ध अगर जिन मूर्तीचा आदर्श समोर ठेवलेला असावा.

कारण, त्यांतही हींच स्वरूपें प्रामुख्यानें दिसून येतात. शिवमुकुट इतक्या बारकाईनें खोदलेला आहे कीं त्यावरील नक्षी पाहतांना प्रेक्षक थक होऊन जातो. मुकुटावर चंद्रकला असून मुकुटाखालून निघणाऱ्या बटा खांद्यांपर्यंत आलेल्या आहेत. मस्तकाच्या मागें प्रभावलय आहे; वर गंधर्व आहेत; खालीं खडकांवर गण बसलेले आहेत. शंकराच्या डावीकडे केळीचें झाड आहे. त्याच्या डाव्या गुडघ्याखालीं सूर्यफूल विकसित होत आहे. दोहीं बाजूंना चामरधारिणी आहेत. वरच्या बाजूला गरुडारूढ विष्णु, अश्वारूढ सूर्य आणि बाजूला गजारूढ इंद्र, हंसारूढ ब्रह्मदेव व अमृतकुम्भधारी चंद्र आहेत. गरुडाचें व अश्वाचें तोंड फोडलेलें आहे – पण एकाचे पंख आणि दुसऱ्याचे खूर, जीन व लगाम शाबूत आहेत; आणि गज तर सर्वस्वीं नष्ट झाला आहे. विष्णु, ब्रह्मदेव व चंद्र यांचीं मुखें उडवलेलीं आहेत.

दक्षयज्ञांतील अपमानानंतर व सतीच्या आत्महत्येनंतर शंकरानें तपश्चर्या आरंभिली तेव्हांचें दृश्य या चित्रांत चित्रित केलेलें आहे. कांहीं संशोधकांचें म्हणणें आहे कीं ही मूर्ति शिवमताचा उद्धार करणाऱ्या लकुलीशाची आहे. वेरूळ व बदामी येथें लकुलीशाच्या मूर्ति आहेत आणि त्यांचें आसन येथें आहे तसेंच आहे. विश्वकर्मावतार वास्तुशास्त्रांत सांगितलें आहे कीं लकुलीशाला पद्मासन असावें आणि त्याच्या एका हातांत महाळुंग व दुसऱ्या हातांत दण्ड असावा. हीं वैशिष्ट्यें येथील मूर्तीचे हातीं होतीं किंवा कसें याबद्दल आतां कांहींच अनुमान काढतां येण्याजोगें नाहीं.

## शिवमंदिर

महामण्डपांत पश्चिम बाजूला शिवमंदिर आहे. चार खांबांच्या चौकटीएवढी जागा त्यानें व्यापिली आहे. मंदिराच्या चारी दिशांना प्रवेशद्वारें असून त्यांना कवाडांचे आंख आहेत. डी कौटो (१६०३) सांगतो कीं या मंदिराचे दरवाजे वर्षांतून एकदां, फक्त शिवरात्रीला, उघडले जात. आतां या द्वारांना कवाडें नाहींत. प्रत्येक द्वाराच्या दोहों

बाजूंना सरासरीनें पंधरा फूट उंचीचे प्रचण्ड द्वारपाल आहेत. त्यांपैकीं फक्त एक शाबूत असून बाकीचे कमीअधिक प्रमाणांत छिन्नविच्छिन्न झालेले आहेत. शिल्पशास्त्रज्ञांचें मत आहे कीं घारापुरीच्या सर्व मूर्तीं- मध्यें आधुनिक शिल्पशास्त्राच्या दृष्टीनें या मूर्ति सर्वांत उत्कृष्ट आहेत. त्यांचीं शिरस्त्राणें व मुकुट वेगवेगळया धर्तींचे आहेत. कोणी पटका बांधून मागें समला सोडतात तसें शिरस्त्राण धारण केलें आहे, तर कोणी हनुवटीखालून एक पदर आंवळून घेऊन तें गच्च बसविलें आहे ; कोणीं जडावाचा मुकुट घातला आहे तर कोणीं मागें प्रभावळ बसविलेलें शिरस्त्राण चढविलें आहे. बैरागी लोक जटांच्या वेटोळ्याचा मुकुट करतात तसें शिरस्त्राण एकाच्या शिरावर आहे. सर्वांच्या कानांत कुण्डलें आणि गळ्यांत व दंडांवर अलंकार आहेत. कोणी मोत्यांच्या तर कोणी रुद्राक्षांच्या सरांचीं जानवीं धारण केलीं आहेत. त्यांचे रत्नखचित कमरपट्टे, जडावाचे बाजूबंद वगैरे अलंकार पाहण्यासारखे आहेत. त्रिमूर्तीसमोरचे द्वारपाल हंसतमुख व शिथिल आहेत तर येथील द्वारपाल खरोखरीच पहाऱ्याचें काम करीत आहेतसे दिसतात. हे द्वारपाल पाहून कोणाला मिसर तर कोणाला असुर देशांतल्या प्राचीन मंदिरावरील द्वारपालांची आठवण होते. ह्या छोट्या मंदिराभोंवतालचे मण्डपाच्या तळापासून छतापर्यंत उंच असलेले द्वारपाल प्रेक्षकांचें लक्ष वेधून घेतात.

मंदिराच्या प्रत्येक दरवाजाला सहा पायऱ्या आहेत ; त्यांचीही पडझड झालेली आहे. मण्डपापेक्षां मंदिराच्या गाभाऱ्याची पातळी सुमारें चार फुटांनीं उंच आहे. मन्दिराचा अंतर्भाग सुमारें एकोणीस फूट औरसचौरस आहे. आंत चौकोनी बैठकीवर सुमारें पावणेतीन फूट व्यासाचें व तीन फूट उंचीचें लिंग आहे. मन्दिराच्या दगडापेक्षां लिंगाचा पाषाण जास्त कणखर दिसतो.

## उपमण्डप

महामण्डपाच्या पूर्वेस व पश्चिमेस महाद्वारें आहेत आणि त्यांलगत उत्तराभिमुखी उपमण्डप व अङ्गणें आहेत. सुमारें पन्नास वर्षांपासून

हीं द्वारें बंद आहेत. पूर्वेकडील अंगणांत सव्वासोळा फूट व्यासाची वर्तुलाकार शिला आहे. शिवमन्दिरासमोरचा नन्दी या शिलेवर असावा असें दिसतें. पूर्वमण्डपाच्या प्रवेशद्वारावर दोन बैठ्या व्याघ्रांचा पहारा आहे. पल्लवांच्या देवालयांत आढळतात तसे हे दिसतात. महामण्डपासारखीच येथेंही अघाडीला वळचण होती आणि आंत त्याच धर्तीचे खांब होते ; पण त्यांची पडझड झालेली आहे. आंतला मण्डप सुमारें साठ फूट लांब व पंचवीस फूट रुंद आहे. महामण्डपासारखेंच शिवमन्दिर येथेंही असून त्याचेभोंवतीं प्रदक्षिणापथही आहे ; मात्र या मन्दिरास एकच द्वार असून त्यावर द्वारपाल नाहींत. मण्डपाच्या मागच्या बाजूला पूर्वेकडे चार हातांचा द्वारपाल व पश्चिमेकडे त्रिनेत्र भैरव अशा प्रचंड पण विच्छिन्न मूर्ति आहेत. उपमण्डपाच्या पूर्वेस व पश्चिमेस अंतर्मण्डप आहेत. पश्चिमेकडील गाभाऱ्यांत दक्षिण बाजूला गजानन, पश्चिम बाजुला अष्टमातृका व उत्तर बाजूला शूलपाणि, अशा मूर्ति आहेत. गणपतीच्या मस्तकावर उंच मुकुट आहे. त्याच्या मांडीवर कोणीं मस्तक ठेवलेलें असून त्यावर गणपतीचा हात ठेवलेला आहे. शूलपाणीच्या हातीं त्रिशूळ आहे ; त्याचे उजवीकडे हंसारूढ ब्रह्मदेव व डावीकडे गरुडारूढ व शंखचक्रगदाधारी विष्णु यांच्या मूर्ति आहेत. अष्टमातृकांचा चित्रपट फार विच्छिन्न झालेला आहे. त्यांपैकीं कांहींच्या आकृति व आयुधें अस्पष्टपणें दिसतात. त्रिशूळ, गज, हंस, गृध्र, मयूर व वृषभ हीं लक्षणें या चित्रपटांतील मातांच्या आकृतींजवळ दिसतात. गणपति व षण्मुख कार्तिकेय यांच्याही मूर्ति ह्या पटांत आहेत. मातृकापटांत बहुशः सप्तमाता असतात. येथें आठ आहेत. अष्ट व नव मातृकापटही अलीकडे उपलब्ध झालेले आहेत.

महामंडपाच्या पश्चिमेकडील समोरचा उपमंडप आकारानें लहान असून त्यांतही शिल्पकृत्यें आहेत. उत्तरेच्या भिंतीवर पद्मासनस्थ महायोगी शिवाची मूर्ति आहे. पश्चिमेकडील भिंतींत खोदलेलें शिवमन्दिर आहे. या मंदिराच्या दारावर द्वारपाल आहेत. मंदिराच्या

पलीकडे पश्चिम भिंतींत शिवमूर्ति खोदलेली आहे. शिवाला सहा हात व तीन नेत्र आहेत. हंसवाहन ब्रह्मदेव, ऐरावतारूढ इंद्र व गरुडावर बसलेला विष्णु यांच्या मूर्ति या पटांत आहेत.

या मंडपाच्या दक्षिणेस खडकाखालीं दडलेला एक विस्तीर्ण जलाशय आहे. खडकांतून वाहणाऱ्या जिवंत झऱ्यांचें पाणी त्यांत धरलेलें आहे. पूर्वीं यासमोर भिंत व तिला दार होतें असें वाटतें; पण तीं आतां पडून गेलीं आहेत. भाविक लोक असें मानतात कीं शंकराच्या सेवेसाठीं प्रत्यक्ष गंगेनें आपलें पाणी येथें आणलें आहे. हा जलाशय खडकांत बराच लांबवर पसरलेला आहे. छताला आधार देणारे आंतले दोन ओबडधोबड चौकोनी खांब बाहेरून दिसतात. हें पाणी अथांग आहे असें मानण्यांत येतें; याचा अर्थ असा कीं तें कधींही आटत नाहीं. छतांतून निखळलेले खडकाचे ढलपे पाण्यांत कोसळले आहेत. यांतला गाळ कोणीं कधीं काढल्याचें ऐकिवांत नाहीं; तरीही पाणी स्वच्छ, रुचकर व नेहमीं थंडगार असतें.

## आणखी लेणीं व अवशेष

महामण्डपापासून अर्ध्या मैलाच्या आंत आणखी तीन लेणीं आहेत. त्यांची फार पडझड झालेली आहे. दुसऱ्या लेण्यांतील द्वारावर मगर खोदलेली आहे आणि तिसऱ्यांतील द्वारावर द्वारपाल आहेत. चवथ्याला सीताबाईचें लेणें म्हणतात. यांत पार्वतीची विच्छिन्न मूर्ति आहे. या लेण्याला संगमरवरी नक्शीचें द्वार होतें, त्याचा आतां मागमूसही नाहीं.

घारापुरी बेटावर प्राचीन अवशेष जागोजाग पडलेले आहेत. त्यांवरून येथें स्तूप, अनेक मन्दिरें व वसतिगृहें असावींत असें दिसतें. फार प्राचीन काळीं बांधकामासाठीं वापरण्यात येणाऱ्या विटा आकारानें फार मोठ्या असत. अशा विटांचे ढीग येथें पडलेले आहेत. चकाकणारे रंग चढविलेल्या विटाही येथें आढळतात. नक्षीदार खांब, भग्न मूर्ति व शिवलिंगें तर किती पडलीं आहेत याची मोजदादही करतां

येणार नाहीं. यांत एक पंचमुखी शिवलिंगही आहे. मुलाला प्यावयाला घेतलेल्या स्त्रीची येथें आढळलेली एक मूर्ति आता मुंबईस रॉयल एशियाटिक सोसायटीच्या संग्रहालयांत नेऊन ठेवण्यांत आली आहे. बेटावर जागोजाग खड्डे खणलेले दिसतात. गुप्त धनाच्या शोधासाठीं ते खोदण्यांत आले आहेत असें सांगण्यांत येतें. मोरे बंदराजवळ एका ठेकेदाराला सुवर्णमुद्रांचा व रत्नखचित अलंकारांचा हंडा सांपडला होता. तेव्हांपासून अनेकांनीं येथें गुप्त धनाचा तलास केला, पण कोणाला कांहीं सांपडल्याचें कोणी सांगत नाहीं.

## लेण्यांचा काळ

हीं लेणीं कोणत्या राजाच्या कारकीर्दींत अगर राजघराण्याच्या अमदानींत खोदण्यांत आलीं याबद्दल निश्चित विधान करण्यास कांहीं साधन नाहीं. शिलालेख होता तो गेला आणि ताम्रपट सांपडले होते तेही गेले; आणि तेही अशा अडाण्यांच्या हातीं कीं त्यांनीं त्यांचें वाचन केलें अगर करविलें नाहीं; इतकेंच नव्हे तर आज ते कोठें आहेत याचाही मागमूस नाहीं. अशा परिस्थितींत या लेण्यांच्या काळाच्या बाबतींत आपणांस अनिश्चित अनुमानांवर अवलंबून रहावें लागणार हें उघड आहे.

येथील महामण्डपांतील खांबांसारखेच खांब वेरूळच्या डामर लेण्यांत आहेत. त्यांचा काळ निश्चित करण्यांत आला आहे. यावरून हीं लेणीं आठव्या शतकांत खोदण्यांत आलीं असलीं पाहिजेत असा फर्ग्युसन या शिल्पशास्त्रज्ञाचा अंदाज आहे. पंडित भगवानलाल इंद्रजी याच मताचे आहेत. ते सांगतात कीं हीं लेणीं वेरूळच्या दशावतार लेण्यांचे अगोदर खोदण्यांत आलीं असलीं पाहिजेत. येथील स्त्रिया केंसाचा अंबाडा बांधतात, केंसांच्या बटा त्यांच्या कपाळावर दिसतात आणि त्यांच्या भावना मुद्रेवर दिसतात. या लक्षणांवरून या मूर्ति आठव्या शतकाच्या प्रथमार्धांत निर्माण झाल्या असल्या पाहिजेत असें त्यांचें मत आहे. बर्गेस यांनीं त्यांना आठव्या-नवव्या शतकांत मांडलें आहे. त्रिधारी

मुकुट, मानेवर पडणाऱ्या कुरळ्या केंसाच्या बटा, कमरपट्टे, धोतराच्या सोग्याच्या गांठीवर हात ठेवणारे पुरुष, वगैरे येथील शिल्पांतील वैशिष्ट्यें पाहतां येथील शिल्पकारांचा ससानियन शिल्पपद्धतीशीं परिचय झालेला होता असें दिसतें. हीं लक्षणें अजिंठा येथील लेण्यांत दिसत नसल्यामुळें यांचा काल त्यांचे नंतरचा असला पाहिजे असें निश्चित करण्यांत आलें आहे.

## बाणासुराची कथा

घारापुरीबद्दलचा सर्वांत प्राचीन उल्लेख पुराणांत आढळतो. हरिवंशांत बाणासुराची कथा आहे. सोनेरी लोंकरीच्या परकथा दंतकथा ऐकून किटलेल्यांनाही मनोरंजक वाटेल अशी ही कथा आहे. बळीला शंभर मुलगे होते. बाणासुर हा त्या सर्वांत वडील. त्याची राजधानी घारापुरी बेटावर होती. तिचें नांव शोणितपुर. शोणित म्हणजे लाल. राजधानीचें बांधकाम लाल किल्ल्यासारखें, लाल दगडांचें अगर पक्क्या भाजलेल्या विटांचें असावें असें वाटतें. बेटावर अशा विटांचे ढीग जागोजाग पडलेले आहेत. तो शंकराचा भक्त. शंकर तर त्याला कार्तिकेयाचा धाकटा भाऊ मानीत असे. शंकराच्या कृपेनें त्याच्या राजधानीवर सोन्याचा पाऊस पडला. कार्तिकस्वामीनें त्याला अति तेजस्वी ध्वज व मयूरवाहन दिलें. उषा ही त्याची कन्या. तिच्यामुळें आपल्याला मृत्यु येणार आहे असें भविष्य वर्तविण्यांत आल्यामुळें त्यानें तिला बंदींत ठेवलें होतें. इतरत्र सांगितलें आहे कीं तिनें आजन्म कुमारिका राहण्याची प्रतिज्ञा केली होती. एकदां तिला शंकरपार्वतींचें दर्शन झालें. तिनें पार्वतीची प्रार्थना केली. पार्वतीनें वरदान देऊन तिला सांगितलें कीं तुझा पति तुला स्वप्नांत भेटेल. पुढें तिला स्वप्नांत अनिरुद्धाचें दर्शन झालें. कृष्णाचा पुत्र प्रद्युम्न हा प्रत्यक्ष मदनाचा अवतार; अनिरुद्ध हा त्याचा पुत्र; मग त्याच्या दर्शनानें उषा विद्ध झाली यांत नवल कसलें? उषेच्या अज्ञात प्रियकराचा ठावठिकाणा लावण्यासाठीं तिची सखी चित्रलेखा हिनें देशोदेशींच्या राजपुत्रांचा

चित्रपट तयार केला. उषेनें स्वरूपसुंदर अनिरुद्धाला ओळखलें. चित्रलेखा द्वारकेला गेली. तिनें अनिरुद्धाची भेट घेतली. तोही बिचारा तळमळत होता, कारण त्याला स्वप्नांत उषेचें दर्शन झालें होतें. त्याचें रहस्य समजल्यावर चित्रलेखा त्याला घेऊन शोणितपुरास आली. तिचे अंगीं योगसामर्थ्य होतें; म्हणून अनिरुद्धासह अदृश्य होऊन ती पहारे-कऱ्यांना नकळत उषेच्या मंदिरांत प्रविष्ट झाली. तिनें या दोघांचा गांधर्व विवाह लावून दिला. तो उषेच्या महालांत गुप्तपणें राहूं लागला. पुढें जें व्हावयाचें तें झालें. राजवाड्यांत कुणकुण सुरू झाली. ही बातमी समजतांच कन्येच्या महालांत वावरणाऱ्या पुरुषाला कैद करण्यासाठीं बाणासुरानें आपल्या सेनापतीला पाठवलें. अनिरुद्धानें त्याचा पराभव केला. तेव्हां बाणासुर स्वतः पुढें झाला. कोणत्याही शस्त्रास्त्रांनीं अनिरुद्ध आटोपेना; तेव्हां बाणासुरानें त्याच्यावर नागपाश सोडून त्याला विद्ध केलें आणि कारागृहांत ठेवलें. नारदाकडून ही बातमी समजतांच यादवांची सेना बरोबर घेऊन कृष्णानें शोणितपुरावर स्वारी केली. या युद्धांत कार्तिकेय व गणपति यांसह प्रत्यक्ष शंकर बाणासुराच्या बाजूनें लढला. या युद्धांत गणपतीचा एक दांत पडल्या-मुळें त्याला एकदंत असें नांव पडलें. बाणासुराला एवढी मदत होती तरी कृष्णानें त्याचा पराभव केला, पण शंकराच्या मध्यस्थीमुळें त्याचा वध केला नाहीं. युद्धसमाप्तीनंतर त्यानें उषेचें अनिरुद्धाशीं लग्न लावून दिलें. उषेच्या मैत्रिणींचे यादववीरांशीं विवाह झाले; नंतर सर्वांना बरोबर घेऊन कृष्ण द्वारकेला गेला. पुढें बाणासुर शिवलोकीं गेला व तेथें शिवगणांचा नायक झाला. या कथेवरून निष्कर्ष काढतां येतो कीं आक्रमक यादव व स्थानिक राज्यकर्ते यांजमध्यें झालेल्या येथील संग्रामाची स्मृति अद्भुत कथानिर्मितीच्या काळांत अस्तित्वांत होती. शिवाय या काळापासून घारापुरीचा संबंध शिवपूजेशीं जडलेला दिसतो. घारापुरीच्या लेण्यांतील सर्व मूर्ति शैव असून त्यांच्या निर्मि-तीचें श्रेय दंतकथा खुद्द बाणासुराला देते.

## पश्चिम सागराची लक्ष्मी

घारापुरी बेटावर मोरेबंदर नांवाचें खेडें आहे असें वर सांगितलें. शेजारच्या कोंकण किनाऱ्यावर उरणनजीक मोरबंदर नांवाचें ठिकाण आहे. मौर्यांच्या महाराष्ट्रांतील प्रतिनिधींचीं हीं ठाणीं असावींत असा संशोधकांचा कयास आहे. जेथें अशोकाचीं शिलाशासनें सांपडतात तेथवर त्याच्या साम्राज्याचा विस्तार होता असें मानण्यांत येतें. घारापुरीपासून जवळच उत्तरेस शूर्पारक येथें अशोकाचें एक त्रुटित शिलाशासन उपलब्ध झालें आहे. उत्तरेस शूर्पारक व दक्षिणेस चौल-चंपावती, हीं प्राचीन काळांतील प्रसिद्ध बंदरें व व्यापारी ठाणीं होतीं. त्यांच्या दरम्यान घारापुरी येथें राजप्रतिनिधीचें ठाणें असणें असंभवनीय नाहीं. अशोकानें हजारों स्तूप बांधवले असें दंतकथा सांगते. सुपाऱ्याचा स्तूप सुप्रसिद्ध आहे. घारापुरी खेड्यानजीक डोंगरावर एका स्तूपाचे व त्याभोंवतालच्या प्रदक्षिणापथाचे अवशेष सांपडले आहेत. या उंचवट्याला येथील लोक 'किल्ला' म्हणतात. जवळच सात खोदीव टांकीं आहेत. हीं कामें तिसऱ्या शतकांतील असावींत असा अंदाज करण्यांत आला आहे. पांचव्या शतकांत प्रचलित असलेल्या लिपींत खोदलेलें 'नारायण' हें नांव असलेली एक मुद्रा आणि सहाव्या शतकांत प्रचलित असलेल्या पद्धतीनें खोदलेली एक सिंहमूर्ति येथें सांपडल्या आहेत.

अशोकच्या अवसानानंतर मौर्यांच्या साम्राज्याचे तुकडे झाले आणि लवकरच त्यांच्याही ठिकऱ्या उडाल्या; आणि त्यांची धूळधाण करणारेही नामशेष झाले. तरी घारापुरीच्या मौर्यांची सत्ता जीव धरून राहिली होती. चालुक्यांच्या ऐहोळे येथील शिलालेखांत पुरीच्या स्वारीचा व विजयाचा उल्लेख आहे. त्यांत पुरीला 'पश्चिम सागराची लक्ष्मी' म्हटलें आहे. सत्याश्रय श्रीपृथ्वीवल्लभमहाराज पुलकेशी चालुक्य यानें ६२० सालीं सम्राट् हर्षवर्धनाचा पराभव केला. नंतर दक्षिणापथांत एकछत्री साम्राज्य स्थापन करण्याच्या उद्योगाला तो लागला. शेंकडों जहाजांचें आरमार बरोबर घेऊन त्यानें पुरीवर

हल्ला केला. त्या वेळीं पुरीचा राजा कोंकणाधिपति सुकेतुवर्मा मौर्य हा होता आणि सेनापति चण्डदण्ड हा चालुक्यांच्या सैन्याचा पुढारी होता. या लढाईंत पुलकेशीनें जातीनें भाग घेतला आणि मौर्यांचा मोड करून पुरीवर आपला अमल बसविला, अपरान्त प्रान्त आपल्या राज्याला जोडला आणि गोकर्णापासून गुजरातपर्यंतचा सलग समुद्र-किनारा आपल्या राज्यांत आणला. नवव्या शतकांत अपरान्तांत शिलाहारांचें राज्य होतें. त्यांची मुख्य राजधानी ठाणें येथें आणि दुय्यम राजधानी मंगलपुरी उर्फ घारापुरी येथें होती. मध्यंतरींच्या काळांत स्थानिक आक्रमकांत परक्या आक्रमकांची भर पडली, जलमार्गानें होणाऱ्या आक्रमणांची संख्या व तीव्रता वाढली आणि प्रकार बदलला; यामुळें आणि तटबंदींत घेरण्याच्या दृष्टीनें हें बेट फार विस्तृत असल्यामुळें शिलाहारांना आपली राजधानी देशाच्या अंतर्भागांत नेणें भाग पडलें असावें; मात्र राजधानी बदलली तरी घारापुरीचें महत्त्व कमी झालें होतें असें नाहीं; कारण त्यांच्याच अमदानींत घारापुरीचीं लेणीं खोदण्यांत आलीं. उत्तर कोंकणच्या शिलाहारांचा शेवटचा राजा सोमेश्वर याचा यादवांनीं १२६३ च्या सुमारास पराभव केला आणि पुरीचा मुलूख देवगिरीच्या राज्याला जोडला.

अलाउद्दीन खलजीनें यादवांचें देवगिरीचें राज्य उध्वस्त केलें, तरी कोंकणपट्टीचा मुलूख त्यानंतर अनेक वर्षेंपर्यंत या घराण्याच्या एका शाखेच्या ताब्यांत होता. अखेर गुजरात सुलतानांनीं ह्या बेटावर कबजा केला. १५६४ च्या सुमारास पोर्तुगीजांनीं हें बेट काबीज केलें आणि त्यांच्या अमदानींत येथील पुरातन व पूज्य शिल्पांची धूळधाण झाली.

## फिरंग्याच्या लीला

घारापुरी हें एका काळीं राजधानीचें ठाणें होतें. राजानें राजकीय परिस्थितीमुळें येथून आपलें ठाणें हालविलें व ठाणें येथें आपली राजधानी उभारली; तरी घारापुरीचें व्यापारी महत्त्व कमी झालें नाहीं.

दहाव्या शतकांतला मासुदी घारापुरीचा उल्लेख संदबुर या नांवानें करतो. इद्रिसी (११५३) सांगतो कीं येथें व्यापारी ठाणें होतें व येथील उपसागरांत नांगर टाकून उभीं असलेलीं परदेशी गलबतें हमेशा आढळत. १५३४ मध्यें हें बेट पोर्तुगीजांच्या ताब्यांत गेलें. डॉम कास्ट्रो हा त्यांचा पहिला राजप्रतिनिधि. त्यानें येथील शिल्पकृत्यें पाहिलीं तेव्हां तो थक्क झाला. मनुष्याच्या हातून असलीं कामें होणें शक्य नाहीं, इतकीं तीं सुंदर आहेत, असे उद्गार त्यानें काढले. हे शब्द फक्त एतद्देशीयांना अनुलक्षून काढलेले नाहींत हें लक्षांत घेण्यासारखें आहे. त्याला येथील लेण्यांत एक शिलालेख आढळला. कोणाही हिंदूला अगर मुसलमानाला तो वाचतां येईना म्हणून त्यानें १५४० सालीं तो पोर्तुगालला पाठवून दिला. तेथेंही तो कोणाला वाचतां आला नाहीं; आणि त्याचें पुढें काय झालें याचाही आतां थांग लागत नाहीं. पोर्तुगीज शिपायांनीं जें जें करता येणें शक्य होतें तें तें करून येथील लेणीं उध्वस्त केलीं. १५५० सालीं गार्सिया द ओर्ता यानें हीं लेणीं पाहिलीं तेव्हां त्याला जनावरांनीं सगळीकडे घाण करून सोडली आहे असें आढळलें. १६०३ सालीं डि कौटो यानें हीं लेणीं पाहिलीं. तो सांगतो कीं पोर्तुगीज सैनिकांच्या धुडगुसामुळें येथील मूर्तींचा नाश झाला आहे. आवाजांचे प्रतिध्वनि कसे होतात हें पाहण्यासाठीं त्यांनीं लेण्यांत तोफा उडविल्या! मूर्तींवरील रंगकाम व लुकण खरवडून काढलें आणि केवळ करमणुकीसाठीं त्यांचे अवयव विच्छिन्न केले! अनेक प्रवाशांनीं पोर्तुगीजांच्या या लीलांचें व त्यांच्या परिणामांचें वर्णन केलें आहे. अजंटा-वेरूळचा परिसर साडेसहाशेंहून अधिक वर्षं मुसलमानांच्या ताब्यांत आहे तरीही तेथील अनेक मूर्ति अभंग राहिल्या आहेत. त्यांहून अधिक विध्वंस पोर्तुगीजांनीं घारापुरींत केला. कारण, त्यांना हें स्थान अलग, असंरक्षित व निर्मनुष्य असें आढळलें; आणि त्यावरील व इतरत्र होणाऱ्या त्यांच्या लीलांना आळा घालणारी प्रबल शक्ति कित्येक वर्षंपर्यंत त्यांच्यासमोर सामन्याला उभी ठाकली नाहीं. त्यांच्यामागून त्यांच्या जागीं आलेल्या राज्यकर्त्यांनीं जाणूनबुजून

मूर्तिभंजनाचें कार्य केलें नाहीं. पण अनेक वर्षेंपर्यंत त्यांच्या संरक्षणाकडेही लक्ष दिलें नाहीं. समुद्रावरून वाहणारे खारे वारे व पावसाळ्यांत कोसळणारा मुसळधार पाऊस आणि झिरपणारें पाणी, यांपासून येथील शिल्पांचें रक्षण करण्यांत आलें नाहीं. १७५० सालीं ग्रोस यानें हीं लेणीं पाहिलीं. तो सांगतो कीं त्यांत जागोजाग पाणी सांचलें होतें आणि त्यामुळें मूर्तीचे पाषाण कुजूं लागले होते. तेंव्हांही त्यांपैकीं अनेकांवरील लुकण व रंगकाम तकतकीत होतें. पुढें तेंही कोसळून पडलें आणि आतां तीं अवशेषरूपांत मात्र अस्तित्वांत आहेत. आमच्या इतकाच निष्काळजीपणा आमच्या ब्रिटिश राज्यकर्त्यांनींही दाखविला. कोणत्याही धर्मांत हात घालावयाचा नाहीं असा त्यांचा बाणा होता – आणि तो त्यांनीं इतक्या पराकोटीला नेला कीं हॅरोल्ड स्मिथ नांवाच्या एका ठेकेदाराला येथें सुवर्णमुद्रांनीं व रत्नजडित अलंकारांनीं भरलेला एक हंडा व दोन ताम्रपट सांपडले आणि सरकारच्या डोळ्यांदेखत ते तो विलायतेंत घेऊन गेला.

## उपसंहार

घारापुरीचीं लेणीं अद्वितीय आहेत आणि हें महाराष्ट्राचें अभिमानस्थान आहे, असें मोघम विधान आरंभीं केलेलें आहे; तें कसें तें आतां सांगतों.

हिंदुस्थानांत जीं लेणीं आहेत त्यांपैकीं विशेष महत्त्वाचीं अशीं लेणीं महाराष्ट्रांतच आहेत. केवळ संख्येच्या व ऐतिहासिक महत्त्वाच्या दृष्टीनेंच नव्हे, तर शिल्पशास्त्राच्या दृष्टीनेंही. हीं सारीं लेणीं देशावर आहेत आणि कांहीं कोंकणांतही आहेत. फक्त घारापुरीचीं लेणीं समुद्रवलयांकित आहेत. या दृष्टीनें तीं अद्वितीय आहेत.

हिंदुस्थानांत लेण्यांचे अनेक समूह आहेत. त्यांपकीं कांहीं निवळ जैन तर कांहीं केवळ बौद्ध अशीं आहेत; आणि कांहीं संमिश्र आहेत. बहुतेक सर्व ब्राह्मणी लेणींही अशाच संकीर्ण समूहांत समाविष्ट झालेलीं आहेत. केवळ ब्राह्मणी व जगानें नांवाजण्यासारखीं अशीं लेणीं घारापुरीशिवाय इतरत्र कोठेंही नाहींत.

समूहांत समाविष्ट असलेलीं अशीं जीं ब्राह्मणी लेणीं इतरत्र आहेत त्यांमध्यें शैव व वैष्णव ह्या दोन्ही पंथांचीं लेणीं आहेत. इतकेंच नव्हे तर वेरूळच्या कैलासासारख्या शिवमंदिरांत स्वतंत्र वैष्णव मूर्ति आहेत. फक्त घारापुरीचींच लेणीं अशीं आहेत कीं येथें केवळ शैव मूर्ति आहेत. येथील शिल्पांत वैष्णव मूर्ति आहेत त्या शैव केंद्र-मूर्तीच्या माहात्म्याला पोषक अशा आहेत.

भारतांत लेणीं खोदण्याची प्रथा प्रथम बौद्धांनीं प्रस्थापित व प्रसृत केली. लेणीं खोदण्याचें तंत्र व मंत्र त्यांनींच निर्माण केले. यामुळें नंतर खोदण्यांत आलेलीं लेणीं त्याच धर्तीवर खोदण्यांत आलीं. मात्र घारापुरीच्या लेण्यांची मांडणी व घाटणी अगदीं स्वतंत्र आहे.

नाशिक, अजंटा, वेरूळ, बदामी, कार्लें व घारापुरी हीं महाराष्ट्राच्या प्राचीन व मध्ययुगीन सामर्थ्याचीं, समृद्धीचीं व संस्कृतीचीं प्रतीकें व आमचीं अभिमानस्थानें आहेत. महाराष्ट्राच्या महावंशांचा इतिहास त्यांशीं निगडित झालेला आहे.

घारापुरीच्या शिल्पकारांनीं येथें आपलें कौशल्यसर्वस्व प्रकट केलें आहे. डि कौटो सांगतो कीं मेणावर किंवा सोन्यावर करतां येणार नाहीं इतकें नाजूक काम येथें दगडावर केलेलें आहे.

घारापुरीच्या विविध मूर्तींत शिल्पकारांचें नाजूक कौशल्यच नव्हे तर महाराष्ट्राचें काव्यपूर्ण व भक्तिपूर्ण अंतःकरण आणि कणखर जिवंतपणाही प्रकट झालेला आहे.

छप्पन्न भोग भोगणारा रणछोडजी हें जसें गुजरातचें दैवत तसा गिरिकंदरात राहणारा शंकर हा महाराष्ट्रांचा देव. हा दलितांचा अधिदेव, हा शूरांचा देवाधिदेव; कीं ज्याच्या नावाचा घोष हाच मराठ्यांचा जयघोष!

देवदेवेश्वराच्या विविध रूपांचें हें प्रदर्शन ज्यांनीं निर्माण केलें त्यांना कितीही धन्यवाद दिले तरी ते थोडेच होणार आहेत।

3964
वा. वा
IRBK-0103175
IRBK-0103175

महाराष्ट्राचें नवें मासिक

# प्रसाद

संपादक : शं. वा. दांडेकर, एम्. ए.
स. आ. जोगळेकर, एम्. ए., एल्एल्. बी.
यशवंत गोपाळ जोशी

- १ ऑगस्ट १९४७ पासून हें मासिक सुरू झालें असून, प्रत्येक अंकाची किंमत १ रुपया आहे. या मासिकाचा खास लघुकथा-स्पर्धा-विशेषांक निघाला असून, त्याची किंमत पांच रुपये आहे. सुरवातीपासून वर्गणीदार होणारास तो वर्गणींतच मिळतो. वार्षिक वर्गणी पोस्टेज-सुद्धां १० रुपये.
- या मासिकाचे पहिले अंकापासून प्रा. शं. वा. दांडेकर यांची अध्यात्मशास्त्राचीं मूलतत्त्वें ही लेखमाला सुरू आहे. घारापुरी हा लेखही 'प्रसाद' मध्येंच पहिल्यांदां प्रसिद्ध झाला आहे. असे अनेक महत्त्वाचे लेख 'प्रसाद'चे दर अंकांत प्रसिद्ध होतात.
- ज्यांना सुरवातीपासूनचे अंक नको असतील, त्यांना कोणत्याही महिन्यापासून वर्गणीदार होतां येतें.

व्यवस्थापक

'प्रसाद' प्रकाशन, ६२२/१५ सदाशिव, पुणें २